## राष्ट्रपतिपदासाठी मुर्मू यांना पाठिंबा द्या –शेवाळे



**मुंबई :** मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी बंड केल्यानंतर शिवसेनेला आणखी एक धक्का बसला आहे. राष्ट्रपतिपदाच्या भाजपच्या उमेदवार द्रौपदी मुर्मू यांना पाठिंबा देण्याची मागणी शिवसेनेचे खासदार राहुल शेवाळे यांनी शिवसेना पक्षप्रमुख व माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्याकडे केली आहे. खासदार शेवाळे यांनी पत्र लिहित ठाकरे यांच्याकडे ही मागणी केली आहे. येत्या काही दिवसांत राष्ट्रपतिपदाची निवडणूक होणार आहे. या निवडणुकीसाठी भाजपकडून द्रौपदी मुर्मू यांना उमेदवारी देण्यात आली आहे, तर विरोधी पक्षांकडून यशवंत सिन्हा यांना रिंगणात उतरविण्यात आले आहे. देशात भाजपकडे बहुमत असून मुर्मू यांना पाठिंबा देण्याची मागणी शिवसेना खासदार राहुल शेवाळे यांनी उद्धव ठाकरे यांच्याकडे केली आहे. त्यामुळे आता बॅकफूटवर गेलेले ठाकरे काय निर्णय घेतात याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.


बुधवार, ६ जुलै २०२२

◆ वर्ष १४ ◆ अंक ३४९

www.ramprahar.com

# राम प्रहर

◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २ ◆ रायगड


### अंतरंग


'संजय राऊतांना शिवसेना संपवायची होती'/२

पनवेलमध्ये धावत्या स्कूल व्हॅनला आग/३

टीम इंडियाचे स्वप्न भंगले; इंग्लंड विजयी/८


# रायगडात जोरधार

## सखल भागांत पाणी साचले; जनजीवन विस्कळीत

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्याला मंगळवारी (दि. ५) सलग दुसऱ्या दिवशी मुसळधार पावसाने झोडपून काढले. सतत पडणाऱ्या पावसामुळे सखल भागांत पाणी साचले होते. त्यामुळे जनजीवन विस्कळीत झाले. दरम्यान, हवामान खात्याने रायगड जिल्ह्यात ८ जुलैपर्यंत रेड अलर्ट जारी केला आहे.

रायगड जिल्ह्यात सोमवारपासून मुसळधार पाऊस पडत आहे. मंगळवारीदेखील दिवसभर अधूनमधून पावसाच्या जोरदार सरी येत होत्या. जिल्ह्यातील सावित्री, काळ, कुंडलिका, अंबा, पाताळगंगा, उल्हास व गाढी या नद्या दुथडी भरून वाहत आहेत. मंगळवारी सकाळी संपलेल्या २४ तासांत जिल्ह्यामध्ये सरासरी १४३.८० मिलीमीटर पावसाची नोंद झाली आहे. तळा तालुक्यात सर्वाधिक २४५ मिमी इतका पाऊस पडला.



**तालुकानिहाय पाऊस (मिलीमीटरमध्ये)**

तळा २४५, माणगाव २३०, महाड १८८, पनवेल १७२.२०, पोलादपूर १६९, उरण १४६, पेण १३९, खालापूर १३५, सुधागड १३४, म्हसळा १२७, माथेरान १२२, मुरूड ११६, कर्जत १०१.६०, रोहा १०७, अलिबाग ८८, श्रीवर्धन ८१. एकूण दोन हजार ३००.८०, सरासरी १४३.८०.

### १,५४३ जणांना सुरक्षितस्थळी हलविले

मुसळधार पावसामुळे जिल्ह्यात आतापर्यंत सहा घरांचे अंशतः नुकसान झाले आहे. अतिवृष्टी आणि दरडी कोसळण्याच्या घटना लक्षात घेऊन जिल्ह्यातील ५२६ कुटुंबांतील एक हजार ५४३ जणांना सुरक्षितस्थळी हलविण्यात आले आहे. यात महाड तालुक्यातील २७३ कुटुंबातील ८८१ जणांचा, पोलादपूर तालुक्यातील २५१ कुटुंबांतील ६५४ जणांचा आणि माणगाव तालुक्यातील दोन कुटुंबांतील आठ जणांचा समावेश आहे.

## भाजप नेते आमदार प्रवीण दरेकर यांच्याकडून महाड, पोलादपूरमधील परिस्थितीची पाहणी



**महाड, पोलादपूर : प्रतिनिधी**

भाजप नेते आमदार प्रवीण दरेकर यांनी मंगळवारी (दि. ५) महाड आणि पोलादपूर तालुक्यातील पूर आणि दरडग्रस्त भागांना भेटी देऊन पाहणी केली. या वेळी त्यांनी प्रशासनाला सतर्क राहून तातडीच्या उपाययोजना करण्याची सूचना केल्या तसेच नागरिकांना सरकारकडून सर्वतोपरी मदत करण्याचे आश्वासन दिले. **(पान २ वर..)**

## ८ जुलैपर्यंत रेड अलर्ट जारी

हवामान खात्याने दिलेल्या पूर्वसूचनेनुसार ८ जुलैपर्यंत रेड अलर्ट जारी करण्यात आला आहे. त्यामुळे जिल्ह्यातील सखल व दरडप्रवण गावातील नागरिकांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. भरतीच्या वेळी अतिवृष्टी होत असल्यास तत्काळ सुरक्षित ठिकाणी आश्रयास जावे. समुद्र खवळलेल्या स्थितीत असल्याने मच्छीमारांनी, पर्यटकांनी व नागरिकांनी समुद्रात पोहण्यास जाऊ नये. पूर व दरडप्रवण भागातील नागरिकांनी आपली महत्त्वाची कागदपत्रे, मौल्यवान दागिने सुरक्षित ठिकाणी ठेवावेत. पुढील तीन दिवस अतिवृष्टीचा इशारा असल्याने घरातील वयोवृद्ध व्यक्ती, आजारी व्यक्तींसाठी आवश्यक औषधे, पिण्याचे पाणी, टॉर्च, मेणबत्ती, माचिस, ड्राय फूड यांचा पुरेसा साठा करून ठेवावा. पावसाळ्यात पाणी दूषित होण्याची शक्यता असते, त्यामुळे पिण्याचे पाणी उकळून प्यावे. महिला, लहान मुले यांची काळजी घ्यावी, असे आवाहन जिल्हा प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

### पनवेल महापालिकेची बांधिलकी

## कोरोना महामारीमध्ये पालक गमावलेल्या बालकांना अर्थसहाय्य



**पनवेल : प्रतिनिधी**

पनवेल महापालिका महिला व बालकल्याण विभागातर्फे महापालिका क्षेत्रातील कोरोना संसर्गामुळे एक पालक किंवा दोन पालक गमावलेल्या २१ वर्षांखालील १२८ बालकांना प्रत्येकी ५० हजारांचे अर्थसहाय्य वाटप मंगळवारी (दि. ५) करण्यात आले.

पनवेल शहरातील आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात झालेल्या या कार्यक्रमास महापौर डॉ. कविता चौतमोल, उपमहापौर सीताताई पाटील, महिला बालकल्याण समिती सभापती हर्षदा उपाध्याय, आयुक्त गणेश देशमुख, अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर, महिला बालकल्याण समितीच्या सदस्य, प्रभाग समिती सभापती व नगरसेवक–नगरसेविका उपस्थित होते. कोरोना काळात अनेक बालकांच्या पालकांचा अकस्मात मृत्यू झाला. २१ वर्षांखालील जी मुले अनाथ झाली अशा अविवाहित मुला–मुलींना आर्थिक मदत देऊन त्यांच्या दुःखाचा भार हलका करावा या उद्देशाने महापालिकेने महिला बालकल्याण समितीच्या सभापती मोनिका महानवर यांच्या काळात महापालिकेच्या वतीने आर्थिक मदत करण्याच्या दृष्टीने भरीव रकमेची तरतूद केली आहे.

पनवेल महापालिका क्षेत्रातील एकूण १२८ बालकांना मंगळवारी मुदत ठेवीच्या स्वरूपात अर्थसहाय्याचे वाटप करण्यात आले. उर्वरित लाभार्थ्यांना त्याच्या वेळेच्या उपलब्धतेनुसार मदतीचे धनादेश देण्यात येणार आहेत. या वेळी महापौर डॉ. कविता चौतमोल यांनी महापालिका ही उपस्थित सर्वांच्या दुःखामध्ये सहभागी असून त्यांचे दुःख हलके करण्याच्या दृष्टीने ही मदत केली असल्याचे सांगितले, तर आयुक्त गणेश देशमुख म्हणाले की, ही मदत बालकांच्या भविष्यासाठी केलेली एक तरतूद आहे. महिला बालकल्याण समितीने कोरोना काळात पालक गमावलेल्यांना आर्थिक मदत देण्याची संकल्पना मांडली. या मदतीच्या रूपातून महापालिका या बालकांना नवी उमेद देत आहोत.

महापालिका क्षेत्रातील कोरोना काळात एक किंवा दोन पालक गमावलेल्या ज्या बालकांना आर्थिक मदत मिळालेली नाही त्यांनी पालिकेच्या महिला व बालकल्याण विभागाशी संपर्क साधावा, असे आवाहन महिला बालकल्याण सभापती हर्षदा उपाध्याय यांनी केले आहे.

या वेळी पनवेल महापालिका क्षेत्रातील एक किंवा दोन पालक गमावलेले मुले–मुली, पालक, नातेवाईक, उपस्थित होते तसेच पालिकेचे अधिकारी व कर्मचारी हजर होते.

### निवडक

#### विवोसह चिनी कंपन्यांवर ईडीचे ४४ ठिकाणी छापे

**नवी दिल्ली :** अंमलबजावणी संचालनालयाने (ईडी) चिनी मोबाइल कंपनी विवो आणि त्याच्याशी संबंधित कंपन्यांवर छापे टाकले आहेत. मनी लॉण्डरिंग प्रतिबंधक कायद्यांतर्गत भारतातील विविध राज्यांमध्ये ४४ ठिकाणी ही कारवाई करण्यात आली. या प्रकरणी सीबीआयही तपास करीत आहे.

#### वास्तूतज्ज्ञ चंद्रशेखर गुरुजी यांची हत्या

**हुबळी :** 'सरल वास्तू' फेम



वास्तूशास्त्रातील तज्ज्ञ चंद्रशेखर गुरुजी यांची मंगळवारी (दि. ५) कर्नाटकातील हुबळी येथे हॉटेलमध्ये चाकूने भोसकून हत्या करण्यात आली. हा संपूर्ण घटनाक्रम सीसीटीव्हीत कैद झाला आहे. दरम्यान, गुरुजींच्या दोन मारेकऱ्यांना अटक केल्याचे वृत्त आहे. यामध्ये एक महिलाही सामिल असल्याचे समजते.

## उद्धव ठाकरेंच्या बडव्यांनी आम्हाला बाजूला काढले

### शिंदे समर्थक आमदाराचा गंभीर आरोप

**वैजापूर : प्रतिनिधी**



आ. रमेश बोरणारे

एकाच वेळी ५० आमदार पक्षातून निघून जातात ही गोष्ट समजण्यासारखी आहे. उद्धव ठाकरे यांच्या आजूबाजूला जे चार बडवे आहेत त्यांनीच आमच्यासारख्यांना बाजूला काढण्याचे काम केले, असा गंभीर आरोप मुख्यमंत्री एकनाथ शिंदे समर्थक आमदार रमेश बोरणारे यांनी केला आहे.

मागील १५ दिवसांत महाराष्ट्रातील राजकारणात उलथापालथ झाली आहे. उद्धव ठाकरे यांनी राजीनामा दिल्यानंतर शिवसेनेचे बंडखोर नेते एकनाथ शिंदे मुख्यमंत्रिपदावर विराजमान झाले आहेत. विधानसभेच्या विशेष अधिवेशनानंतर १५ दिवसांनी शिंदे समर्थक आमदार रमेश बोरणारे आपल्या वैजापूर विधानसभा मतदारसंघात परतले. त्यांचे जोरदार स्वागत करण्यात आले. या वेळी आमदार बोरणारे प्रसारमाध्यमांशी बोलत होते.

गेल्या ३० वर्षांपासून मी शिवसेनेत काम करीत आहे. शिवसेनाप्रमुख स्व. बाळासाहेब ठाकरे म्हणाले होते की, माझ्या शिवसैनिकाला मुख्यमंत्री करा. आता एकनाथ शिंदे मुख्यमंत्री झाले आहेत याचा आम्हाला आनंद आहे. बंडखोरी का झाली याबाबत मुख्यमंत्री शिंदे यांनी सर्व सांगितले आहे. त्यामुळे मी अधिक बोलणार नाही, असे सांगून आमदार बोरणारे पुढे म्हणाले की, आम्ही बंडखोरी केली नाही, तर उठाव केला आहे. अन्यायाविरुद्ध लढा देण्याचा कानमंत्र आम्हाला बाळासाहेब ठाकरे यांनी दिला आहे. तालुक्याच्या विकासासाठी एकनाथ शिंदे यांच्यासोबत जाण्याचा निर्णय मी घेतला.

## अग्निपथ योजनेत तरुणींनाही संधी; २० टक्के जागा राखीव

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

सैन्य दलात भरतीची इच्छा असणाऱ्या तरुणींसाठी खुशखबर आहे. केंद्र सरकारने घोषणा केलेल्या अग्निपथ योजनेमध्ये तरुणींनाही संधी मिळणार आहे. त्यामुळे अग्निवीर होण्याची तरुणींची इच्छा पूर्ण होणार आहे. अग्निपथ योजनेमध्ये २० टक्के जागा तरुणींसाठी राखीव असणार आहेत.

लष्करात अग्निपथ योजनेनुसार भरती प्रक्रिया सुरू झाली आहे. या योजनेत २०२२च्या पहिल्या बॅचमध्ये २० टक्के जागा तरुणींसाठी राखीव ठेवण्यात आल्या आहेत. भारती वायुसेनेसाठी अग्निपथ योजनेंतर्गत नोंदणी केलेल्या उमेदवारांची २४ ते ३१ जुलैदरम्यान ऑनलाइन परीक्षा घेतली जाईल. यानंतर २१ ते २८ ऑगस्टदरम्यान शारीरिक चाचणी होईल. पुढे २९ ऑगस्ट ते ८ नोव्हेंबरपर्यंत वैद्यकीय चाचणी होईल. यात पात्र ठरणाऱ्या उमेदवारांची यादी १ डिसेंबर रोजी जारी करण्यात येईल. यानंतर ३० डिसेंबरपासून प्रशिक्षणाला सुरुवात होणार आहे.

## उपमुख्यमंत्री फडणवीसांचे नागपुरात जंगी स्वागत



**नागपूर : प्रतिनिधी**

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे मंगळवारी (दि. ५) नागपुरात जंगी स्वागत करण्यात आले. या वेळी भाजप कार्यकर्त्यांनी तुफान गर्दी केली होती. याच प्रेमामुळे आपण यशस्वी आहोत, अशी भावना फडणवीसांनी व्यक्त केली.

उपमुख्यमंत्री फडणवीस यांचे नागपूर विमानतळावर सकाळी ११.३० वाजता आगमन झाले. **(पान २ वर..)**

> **राज्यात जोरदार पाऊस पडत आहे. कोकणात पूरस्थिती निर्माण झाली आहे. यावर आम्ही लक्ष ठेवून आहोत. परिस्थिती हाताळण्यासाठी मी आदेश दिले आहेत. इथे कार्यकर्त्यांचा जल्लोष आहे, मात्र जबाबदारीची जाणीव आहे. मी लगेचच कामाला लागणार आहे.**
>
> **–देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री**

### श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळातर्फे

## गव्हाण विभागातील विद्यार्थ्यांना वह्यावाटप



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

सामाजिक, शैक्षणिक, कला, क्रीडा, सांस्कृतिक, आरोग्य क्षेत्रात गेली तीन दशके उल्लेखनीय कार्य करणारे श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ आणि भाजप उलवे नोड यांच्या संयुक्त विद्यमाने गव्हाण विभागातील गरजू विद्यार्थ्यांना सोमवारी (दि. ४) भाजप पनवेल तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या हस्ते वह्यांचे मोफत वाटप करण्यात आले.

शिवाजीनगर जि.प. शाळा, कोपर जि.प. शाळा, गव्हाण कन्या शाळा व गव्हाण जि.प. शाळा या विद्यालयांतील विद्यार्थ्यांना वह्यांचे मोफत वाटप करण्यात आले. या कार्यक्रमास न्हावे ग्रामपंचायतीचे सरपंच हरिश्चंद्र म्हात्रे, गव्हाण ग्रामपंचायतीच्या सरपंच माई भोईर, उपसरपंच विजय घरत, पांडुशेठ घरत, वसंत पाटील, भाजपचे तालुका चिटणीस जयवंत देशमुख, वाहतूक संघटनेचे जिल्हा उपाध्यक्ष हेमंत ठाकूर, उलवे नोड उपाध्यक्ष अनंता ठाकूर, वसंतशेठ पाटील, वहाळचे उपसरपंच अमर म्हात्रे, माजी उपसरपंच रामदास ठाकूर, कोळी समाज अध्यक्ष विश्वनाथ कोळी, भाऊ भोईर, माजी ग्रामपंचायत सदस्य स्नेहलता ठाकूर, जयश्री कोळी, उषा कोळी, पूर्वा वास्कर, रघुनाथ देशमुख, सुधीर ठाकूर, साईनाथ मोकल, कोपर शाळा चेअरमन अनंता ठाकूर, निलेश ठाकूर, शिवाजी नगर गाव उपाध्यक्ष व्ही. के. ठाकूर, जी. के. ठाकूर, टी. के. ठाकूर, आशा म्हात्रे, वर्षा कोळी, अजय भगत, सुहास भगत, किशोर ठाकूर यांच्यासह ग्रामपंचायत सदस्य, पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## महाडमधील जमिनीला पडलेल्या भेगेची भूवैज्ञानिकांकडून पाहणी

### प्राथमिक तपासणीअंती कोणताही धोका नसल्याचा निष्कर्ष

**अलिबाग : प्रतिनिधी**

महाड तालुक्यातील बावळे येथे पावसामुळे जमिनीला भेग पडल्याचे निदर्शनास आले होते. जिल्हाधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर यांच्या निर्देशानुसार वरिष्ठ भूवैज्ञानिक हनुमंत संगनोर, वरिष्ठ भूवैज्ञानिक तथा जिल्हा खनिकर्म अधिकारी रोशन मेश्राम यांच्यासह प्रांताधिकारी प्रतिमा पुदलवाड, तहसीलदार सुरेश काशिद यांनी बावळे गाव परिसराला भेट देऊन तेथील जमिनीला पडलेल्या भेगेची पाहणी केली.



महाड तालुक्यातील बावळे गाव परिसरातील जमिनीला पडलेली भेग उत्तर–दक्षिण असून तिची लांबी सुमारे १५ ते २० मीटर एवढी आहे, तर या भेगेची खोली दीड ते दोन फूट असून त्यात पाणी साठलेले आहे. यावरून ही भेग मातीमध्ये पाण्याचे प्रमाण वाढल्यामुळे पडली असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते. तथापि, या भेगेबाबत सविस्तर अभ्यास करण्यासाठी भारतीय भूवैज्ञानिक सर्वेक्षण विभाग पुणे यांना कळविण्यात आले आहे.

प्राथमिक पाहणीदरम्यान या भेगेमुळे कोणताही धोका संभवत नसून नागरिकांनी घाबरू नये, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले असून या भेगेची दररोज दोन ते तीन वेळा पाहणी करून काही बदल असल्यास स्थानिक प्रशासनास त्वरित कळविण्याबाबत संबंधित सरपंच व गावकऱ्यांना सूचनाही देण्यात आल्या आहेत.

# गेल्या अडीच वर्षांत कोण राज्य चालवतेय तेच समजत नव्हते!

## ▌उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा नागपुरात टोला

**मुंबई : प्रतिनिधी**


गेली अडीच वर्ष ही अनाचार, दुराचार, भ्रष्टाचार, अत्याचाराची गेली. राज्यात प्रशासन नावाची गोष्टच नव्हती. कोण कुणाचे ऐकत नव्हते. अनेक राजे काम करत होते. कोण राज्य चालवतंय तेच समजत नव्हते. सामान्य माणसाचे कुणी ऐकायला तयार नव्हते. शिवाजी महाराज हे आपले आराध्य दैवत आहेत. छत्रपतींनी जो गनिमी कावा सांगितला, त्याच गनिमी काव्याने आणि छत्रपतींसारखे निधड्या छातीने महाराष्ट्रात हे सरकार पुन्हा एकदा आले असे भाजपाचे नेते आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी यांनी सांगितले. तसेच त्यांनी या वेळी शिवसेना आणि उद्धव ठाकरे यांच्यावर टीका केली.

राज्यात एकनाथ शिंदे आणि देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली नवीन सरकार स्थापन झाले आहे. आता नेमके काय आणि कसे घडले? यावर राजकीय विश्लेषक खल करू लागले आहेत. विशेषत: १०६ आमदारांचा पाठिंबा असूनही देवेंद्र फडणवीसांनी ४० आमदारांसोबत आलेल्या एकनाथ शिंदेंना मुख्यमंत्रीपद देऊ केले आणि स्वत: उपमुख्यमंत्री झाले. त्यामुळे अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत. मंत्रिमंडळात जाणार नसल्याचे सांगूनही अर्ध्या तासात फडणवीसांनी उपमुख्यमंत्रीपद कसे स्वीकारले? असा प्रश्न उपस्थित केला जात असताना खुद्द देवेंद्र फडणवीसांनीच त्याविषयीही खुलासा केला आहे. ते म्हणाले, मी म्हटले होते की हे सरकार बनवेन, पण मी सरकारमध्ये जाणार नाही. तशी घोषणाही केली होती. पण घोषणा करून घरी गेलो आणि राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डांनी जाहीर करून टाकले की फडणवीसांनी सरकारमध्ये जावे. नड्डा, अमित शाह माझ्याशी बोलले. शेवटी मोदींशी संवाद केल्यानंतर पक्षाचा आदेश हाच महत्त्वाचा आहे, हे लक्षात घेऊन एकच निर्णय घेतला आहे. काही लोक म्हणतात, हे सरकार सहा महिने चालेल. २०१४चे सरकार आल्यानंतर तेव्हाही हेच म्हणायचे की, वर्षभराच्या वर सरकार चालणार नाही. पण ४० वर्षांनंतर पहिल्यांदा पाच वर्ष पूर्ण करणारा हा देवेंद्र फडणवीस होता. २०१४मध्ये महाराष्ट्रात पूर्ण बहुमताचे सरकार आणल्याशिवाय राहणार नाही, अशा शब्दांत देवेंद्र फडणवीसांनी विरोधकांना टोला लगावला आहे.



# संजय राऊत यांना शिवसेना संपवायची होती

## मुख्यमंत्री शिंदे समर्थक आ. संजय गायकवाड यांचा घणाघात



**अकोला : प्रतिनिधी**

खासदार संजय राऊत हे राष्ट्रवादीची सुपारी घेऊन १०० टक्के शिवसेना संपवायला निघाले होते, असा घणाघाती आरोप मुख्यमंत्री शिंदे समर्थक बुलढाण्याचे आमदार संजय गायकवाड यांनी केला आहे. बुलढाणा येथे परतल्यावर त्यांनी मंगळवारी पत्रकारांशी संवाद साधला. चिडलेल्या आ. गायकवाड यांनी खा. संजय राऊत यांचा एकेरी शब्दात उल्लेख करत त्यांच्यावर जोरदार टीकेची तोफ डागली.

आमदार गायकवाड म्हणाले, संजय राऊत यांनी जर बाप काढला तर मलाही काढता येतो. ज्या ४२ जणांनी त्यांना मतदान केले ते सर्व त्यांचे पण बाप आहेत. आधी खासदारकीचा राजीनामा द्या. मग आम्हाला सांगा. राष्ट्रपुरुष कुणाचा व्यक्तिगत नसतो, देशाचा असतो. आमच्या प्रत्येक फलकावर बाळासाहेबांचे छायाचित्र असणारच, असेही त्यांनी स्पष्ट केले. जे जनतेतून निवडून येत नाही, त्याच चार पाच लोकांना तिकडे महत्व आहे. तेच चार पाच लोक उद्धव ठाकरेंकडे आहेत असेही गायकवाड म्हणाले.

दरम्यान, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे सरकार आल्यावरही शिवसेना उध्दव ठाकरे आणि शिवसेना कार्यकर्त्यांकडून आरोप सुरुच आहेत. शिंदे समर्थकांकडूनही त्याला तेवढेचे प्रतिउत्तर दिले जात आहे.

# देश पातळीवरील लक्ष्य ऑलिम्पिक मिशन सदस्य समितीमध्ये ॲड. आशिष शेलार

**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबई क्रिकेट असोसिएशनचे माजी अध्यक्ष भाजपा नेते, आमदार आशिष शेलार यांना देशाच्या क्रीडा प्राधिकरणाने लक्ष्य ऑलिम्पिक मिशनच्या सदस्य समितीमध्ये आमंत्रित केले आहे. देशाच्या टार्गेट ऑलिम्पिक पोडियम योजनेसाठी काम करणारी लक्ष्य ऑलिम्पिक मिशन ही १६ सदस्यीय समिती असून त्यामध्ये ॲड.आशिष शेलार यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

ॲड.आशिष शेलार यांनी यापूर्वी मुंबई क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्षपद भूषविले होते. तसेच फुटबॉल असोसिएशनचे अध्यक्ष, दोरी उड्या असोसिएशनचे कार्याध्यक्ष या संघटनांच्या मध्येही त्यांनी काम केले आहे. खेळाची आवड असलेले आमदार ॲड. आशिष शेलार हे राजकारणासोबतही क्रीडा क्षेत्रातील सक्रिय सहभागी आहेत. तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सरकारमध्ये त्यांच्यावर क्रीडामंत्री म्हणूनही जबाबदारी देण्यात आली होती. तसेच फुटबॉल, क्रिकेट, हॉकी, धनुष्यबाण, बास्केट बॉल, स्केटिंग या खेळांसाठी त्यांनी वांद्रे येथे दोन मैदाने निर्माण केली. तसेच मुंबई क्रिकेट असोसिएशनचे मार्फत मुंबई प्रिमियम लिग ही त्यांनी सुरु केली. लक्ष्य ऑलिम्पिक पोडियम योजनेमध्ये भारत सरकारच्या युवा मंत्रालयाने हे मिशन सुरू केले आहे.

राष्ट्रीय क्रीडा विकास निधीच्या अंतर्गत ऑलिम्पिक खेळांमध्ये ऑलिम्पिक पोडियम प्राप्त करण्याची क्षमता निर्माण करणे, जास्तीत जास्त पदक, उत्कृष्टता प्राप्त करण्यासाठी योजनांची अंमलबजावणी आणि देखरेख तसेच खेळाडूंना चांगल्या सुविधा निर्माण करण्याच्या दिशेने ही समिती कार्यरत आहे.

या समितीचे अध्यक्ष क्रीडा महासंचालक असून अध्यक्ष,ॲथलेटिक्स फेडरेशन ऑफ इंडिया, अध्यक्ष, भारतीय कुस्ती महासंघ, अध्यक्ष, भारतीय तिरंदाजी असोसिएशन, अध्यक्ष, भारतीय बॉक्सिंग फेडरेशन आदिंसह बायचुंग भुतिया (फुटबॉल), अंजू बॉबी जॉर्ज (ॲथलेटिक्स), अंजली भागवत (शूटिंग), तृप्ती मुरगुंडे (बॅडमिंटन), सरदारा सिंग (हॉकी), वीरेन रस्किन्हा, (हॉकी आणि ऑलिम्पिक गोल्ड क्वेस्ट), मालव श्रॉफ (नौकान आणि क्रीडा विज्ञान विशेषतज्ञ), मोनालिसा मेहता (टेबल टेनिस), दिप्ती बोपय्या (सीईओ गोस्पोर्ट्स फाउंडेशन), योगेश्वर दत्त (कुस्ती), गगन नारंग (शूटिंग) आदी आंतरराष्ट्रीय खेळाडूंचा यामध्ये समावेश करण्यात आलेला आहे. सर्व सदस्यांचे अभिनंदन होत आहे.

# आमदार महेंद्र थोरवे यांचे कर्जतमध्ये स्वागत


**कर्जत : बातमीदार**



कर्जत विधानसभा मतदारसंघाचे आमदार महेंद्र थोरवे हे कर्जत येथून मुंबई येथे १७ जून रोजी विधानपरिषद निवडणुकीसाठी गेले होते. त्यानंतर तब्बल १५ दिवसांनी थोरवे हे एकनाथ शिंदे यांचा मुख्यमंत्री पदाचा शपथविधी तसेच विश्वासदर्शक ठराव जिंकूनच कर्जत येथे आपल्या मतदारसंघात पोहचले. चार जुलैच्या रात्री कर्जत येथे पोहचलेले आमदार महेंद्र थोरवे यांचे कर्जत तालुक्यात त्यांच्या समर्थकांनी जोरदार स्वागत केले.

गेली वर्षभर शिवसेना नेते एकनाथ शिंदे गटाचे समजले जाणारे कर्जत विधानसभा मतदारसंघाचे आमदार महेंद्र थोरवे हे राज्य विधिमंडळातून निवडून द्यावयाच्या विधानपरिषद निवडणुकीसाठी १७जून रोजी मुंबई येथे पोहचले होते. विधानपरिषदेच्या १० जागांसाठी निवडणूक झाली आणि निकालानंतर त्याचरात्री एकनाथ शिंदे हे आपल्यासोबत असलेल्या आमदारांना घेऊन सुरतला रवाना झाले. दरम्यान, सुरतवरून गुवाहाटी तेथून गोवा असा यशस्वी घडामोडी करणारा राजकीय प्रवास करून एकनाथ शिंदे हे राज्याचे मुख्यमंत्री झाल्यानंतर शिंदे सरकारवरील अविश्वास दर्शक ठराव जिंकून शिंदे समर्थक आमदार तब्बल अर्ध्या महिन्यानंतर आपल्या गावी परतले. कर्जतचे आमदार थोरवे हे आपल्या घरी मतदारसंघात पोहचले आहेत. या वेळी आमदार थोरवे यांचे स्वागत त्यांचे समर्थक यांनी कर्जत चारफाटा येथे केले. त्यावेळी असंख्य कार्यकर्ते रात्र झाली असतानादेखील उपस्थित होते. त्यानंतर असंख्य गाड्यांचा ताफा महेंद्र थोरवे यांच्या पोसरी येथील निवासस्थानी पोहचला. तेथे थोरवे यांच्या पत्नी मीना महेंद्र थोरवे यांनी त्यांचे औक्षण केले.

(छाया : सलीम शेख)



**माणगाव : भाजप नेते आमदार प्रवीण दरेकर यांचे माणगावात राजेश मेहता यांच्या निवासस्थानी स्वागत करताना जि.प.चे माजी सभापती ॲड. राजीव साबळे, माणगाव नगराध्यक्ष ज्ञानदेव पवार, उपनगराध्यक्ष सचिन बोंबले, पाणीपुरवठा सभापती राजेश मेहता, नगरसेवक दिनेश रातवडकर, माजी नगरसेवक नितीन बामगुडे व उद्योजक प्रसाद धारिया.**

# 'सारथी'कडून निवृत्त सैनिक, ज्येष्ठ चालकांचा सत्कार

**पुणे : प्रतिनिधी**

बोपगाव पुणे येथे सारथी संस्थेमार्फत आयोजित महामेळाव्यात माजी सैनिक विनोद घुगे, दिनकर फडतरे तसेच इतर ज्येष्ठ वाहन चालकांचा सत्कार करण्यात आला. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून शेकडो सारथी चालक मेळाव्याला उपस्थित होते.

सारथी संस्था ही तमाम ड्रायव्हर चालक बंधुंना रस्त्यावर येणाऱ्या अडचणीत मदत पोहोचवत असते प्रत्येक जिल्ह्यात तालुक्यात सारथी संस्थेचे सभासद आहेत. त्यांच्या संपर्कशक्तीद्वारे हे मदतकार्य केले जाते. दरम्यान मेळाव्यात संस्थापक अध्यक्ष योगेश दादा कांबळे, महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष विनोद दादा घुगे, कोकण प्रदेशाध्यक्ष सुशांत दादा ताम्हणकर, संचालक शिवकुमार काका उमरदंड, राम शाहीर, याकुब पठाण, जनार्दन नाळे, राकेश शिंदे तसेच महाराष्ट्रातील सर्व तालुक्यांतील सारथी पदाधिकारी उपस्थित होते.





**पनवेल : श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या वतीने आसूडगाव जि.प.शाळेत गरजू विद्यार्थ्यांना भाजप तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या हस्ते मोफत वह्यावाटप करण्यात आले. या वेळी ओबीसी सेल जिल्हा सरचिटणीस दशरथ म्हात्रे, शशिकांत शेळके, मनोहर म्हात्रे, रमेश नाईक, बालन नाईक आदी.**


MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**e-TENDER NOTICE**

MSETCL invites online bids (e-Tender) from reputed and registered contractors on Mahatransco e-Tendering Website **https://srmetender.mahatransco.in/** for the following Tender specification.

| RFX | Description | Esti. cost |
|---|---|---|
| **Tend-21/22-23 7000023511** | Work of replacement of existing old Earth wire of 100kV Apta – Thal, 100kV Apta – Jite & Jite – Thal with new Earthwire under EHV (O&M) Division Panvel. **Tender Fee- Rs. 500/-+ GST** | **Rs. 68.68 Lakhs** |
| **Tend-27/22-23 7000023893** | Work of Supply Erection Testing and Commissioning of 3 Nos. of 22kV Feeder along Civil works on turnkey basis at 100kV Mhasala S/stn under EHV (O&M) Dn. Mahad. **Tender Fee- Rs. 500/-+ GST** | **Rs. 72.23 Lakhs** |

**EMD 1% of estimated cost. Submission of bids from 05.07.2022 to 12.07.2022 up to 23:59 hrs, Opening date:- 13.07.2022 @ 11:00 Hrs.**

For further details visit our website **https://srmetender.mahatransco.in/**

**Contact Person:** The Executive Engineer (Adm) Tel. No. 022-27459624,

Mob. No. 8356921558 E-mail ID **se7200@mahatransco.in**

**Sd/-**
**SUPERINTENDING ENGINEER**
**EHV (O&M) CIRCLE, PANVEL**


# 'प्रत्येक विद्यार्थ्याने उच्च शिक्षणाची कास धरावी'

**पनवेल : रामप्रहर वृत्त**



शिक्षणाला मानवी जीवनात अनन्य साधारण महत्व असून शिक्षण समृद्ध जीवनाचा मार्ग आहे, त्यामुळे प्रत्येक विद्यार्थ्याने उच्च शिक्षणाची कास धरली पाहिजे, असे प्रतिपादन पनवेल तालुका पत्रकार विकास संस्थेचे अध्यक्ष ज्येष्ठ पत्रकार माधव पाटील यांनी मंगळवारी (दि. ५) कष्टकरीनगर येथे केले. पनवेल तालुका पत्रकार विकास संस्थेचे सल्लागार डॉ. संजय सोनावणे यांच्या वाढदिवसाचे औचित्याने जिल्हा परिषदेच्या कष्टकरीनगर शाळेतील विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. त्यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना ते बोलत होते. या वेळी डॉ. संजय सोनावणे, संस्थेचे सदस्य संजय कदम, विवेक पाटील, हरेश साठे, सुनील राठोड, संकेत भोईर, तुराडे ग्रामपंचायतीचे माजी उपसरपंच विश्वनाथ गायकवाड, शिक्षिका अनिता वाघमारे, शर्मिला उपरे, शिक्षक अशोक नेटके आदी उपस्थित होते. या वेळी मान्यवरांनी विचार व्यक्त केले.


राम प्रहर
वाचनीय बातम्या आणि जाहिरातींसाठी वाचा


## दुखवटा

# संदीप पाटील

**अलिबाग : प्रतिनिधी**



अलिबाग तालुका युवक काँग्रेसचे माजी अध्यक्ष संदीप यशवंत पाटील यांचे मंगळवारी मुंबईत उपचारादरम्यान निधन झाले.

अत्यंत धडपड्या स्वभावाचे संदीप पाटील सामाजिक कार्यात नेहमी पुढे असत. शासकीय तसेच रुग्णालयातील कामांमध्ये संदीप पाटील हे गोरगरीबांना नेहमीच मदत करीत.

मागील काही दिवसांपासून ते आजारी होते. त्यांच्यावर मुंबईतील रूग्णालयात उपचार सुरू होते. संध्याकाळी उशिरा लेभी या मूळ गावी त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. या वेळी विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

पान १ वरून

# भाजप नेते आमदार प्रवीण दरेकर यांच्याकडून महाड, पोलादपूरमधील परिस्थितीची पाहणी

गेले दोन दिवस पडणाऱ्या मुसळधार पावसामुळे महाड शहरासह लगतच्या गावांमध्ये पूरपरिस्थिती निर्माण झाली होती तसेच मंगळवारी सकाळी ७च्या सुमारास दासगाव भोईवाड्यात रहदारीचा रस्ता खचून कडेला बांधण्यात आलेली भिंत एका घरावर कोसळली. त्यामुळे संपूर्ण दासगाव परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. भाजप नेते आमदार प्रवीण दरेकर यांनी तेथे पाहणी करून तत्काळ संरक्षण भिंत बांधण्याच्या सूचना बांधकाम विभागाला केल्या.

तत्पूर्वी, आमदार दरेकर यांनी पोलादपूर तालुक्यातील दरड कोसळलेल्या चोळई येथे भेट देऊन पाहणी केली. या वेळी त्यांनी आता आपले सरकार आले आहे. तुमच्या राहण्यासह रोजगाराची जबाबदारी आमची असल्याचे सांगत स्थानिक रहिवाशांना दिलासा दिला.


दरम्यान, शिवसेनेचे प्रतोद आमदार भरत गोगावले यांनीदेखील आमदार प्रवीण दरेकर यांच्यासोबत पूर नियोजन आणि आपतकालीन व्यवस्थापनाचा आढावा घेतला. या वेळी जिल्हाधिकारी महेंद्र कल्याणकर, भाजप दक्षिण रायगड जिल्हाध्यक्ष ॲड. महेश मोहिते, रविशेठ मुंडे, जिल्हा सरचिटणीस बिपीन महामुणकर, तालुकाध्यक्ष जयवंत दळवी, राजेश मपारा, पोलादपूर शहराध्यक्ष राजाभाऊ दिक्षित, नगरसेविका अंकिता निकम, राजन धुमाळ, एकनाथ कासुर्डे, समाधान शेठ, नामदेव शिंदे, महेश शिंदे, संजयअप्पा ढवळे, संदीप ठोंबरे, अतिरिक्त पोलीस अधीक्षक अतुल झेंडे, उपविभागीय अधिकारी प्रतिमा पुदलवाड, विभागीय पोलीस अधिकारी निलेश तांबे, तहसीलदार सुरेश काशिद आदी उपस्थित होते.

# उपमुख्यमंत्री फडणवीसांचे नागपुरात जंगी स्वागत

या वेळी ढोल-ताशाच्या निनादात त्यांचे स्वागत करण्यात आले. स्वागतासाठी भाजपचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. विमानतळावर स्वागत केल्यानंतर उपमुख्यमंत्री फडणवीस यांची निवासस्थानापर्यंत भव्य मिरवणूक काढण्यात आली.

या वेळी उपमुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, नागपूरकरांनी माझ्यावर नेहमीच प्रेम केले आहे. आज उपमुख्यमंत्री झाल्यानंतर पहिल्यांदा आलो असता प्रेम व्यक्त करण्यासाठी एवढे लोक जमले आहेत. मी त्यांचे मनापासून आभार मानतो. आज मी जो काही आहे ते त्यांच्या प्रेमामुळे आणि विश्वासामुळे आहे.


पनवेल भाजपतर्फे
जनहितार्थ
माहितीसाठी




**पनवेल महानगरपालिका हद्दीत**
**बुधवार, दि. ६ जुलै २०२२ रोजी होणारे**
**कोरोना प्रतिबंधक लसीकरण**
**(सर्व केंद्रांवर ऑनलाइन व ऑफलाइन लसीकरण होईल)**

कोविशिल्ड कोव्हॅक्सिन कार्बेव्हॅक्स

**सर्व केंद्रांवर (वयोगट :** १२ वर्षांवरील सर्व नागरिकांसाठी)

- १. यूपीएचसी-१, गावदेवी पाडा, पनवेल
- २. रोटरी क्लब, से. १९, नवीन पनवेल
- ३. यूपीएचसी-४, सिडको समाज मंदिर, कळंबोली
- ४. यूपीएचसी-५, डी-मार्टच्या मागे, सेक्टर १५, खारघर
- ५. यूपीएचसी-६, सुषमा पाटील विद्यालय, कामोठे
- ६. टाटा ॲडव्हान्स सेंटर, खारघर
- ७. आरोग्य उपकेंद्र काळभैरव मंगल कार्यालय, प्रभाग समिती ब कार्यालयाच्या बाजूला, कळंबोली
- ८. उपजिल्हा रुग्णालय, पनवेल

**Pricautionary dose हे फक्त दुसरा डोस घेऊन नऊ महिने पूर्ण झालेल्या HCW, FLW, व ६० वर्षांवरील Comorbid व्यक्तिंचेच लसीकरण केले जाईल याची नोंद घ्यावी.**

# जेएनपीएमध्ये मेरीटाईम पीपीपी कॉन्क्लेव्ह






## केंद्रीय राज्यमंत्री श्रीपाद नाईक यांच्या हस्ते उद्घाटन

**उरण : वार्ताहर, प्रतिनिधी**

जवाहरलाल नेहरू बंदर प्राधिकरण (जेएनपीए), भारतातील सर्वोत्तम कामगिरी करणारे बंदर; मुंबई बंदर प्राधिकरण (एमबीपीए) यांच्या संयुक्त विद्यमाने पब्लिक-प्रायव्हेट-पार्टनरशिप (पीपीपी) मॉडेलची २५ वर्षे यशस्वीरित्या पूर्ण झाल्याचे चिन्हांकित करण्यासाठी दोन दिवसीय मेरिटाइम पब्लिक प्रायव्हेट पार्टनरशिप कॉन्क्लेव्ह, २०२२चे केंद्रीय बंदरे, शिपिंग आणि जलमार्ग मंत्रालय, भारत सरकारच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार आयोजन करण्यात आले.

कॉन्क्लेव्हचे उद्घाटन भारत सरकारच्या शिपिंग आणि जलमार्ग आणि पर्यटन मंत्रालय बंदरे राज्यमंत्री श्रीपाद नाईक यांच्या हस्ते व जेएनपीए जेएनपीए संजय सेठी, उपाध्यक्ष उन्मेष शरद वाघ एमबीपीए एमबीपीए राजीव जलोटा, उपाध्यक्ष आदेश तितरमारे आदी मान्यवरांच्या उपस्थितीत झाले.

विकासाचे पीपीपी मॉडेल प्रथम १९९०च्या दशकाच्या मध्यात बंदर क्षेत्रात आणले गेले. जेएनपीएने १९९७ मध्ये न्हावा-शेवा इंटरनॅशनल कंटेनर टर्मिनलसह खाजगी कंपनीसोबत पहिला करार केला. तेव्हापासून पीपीपी हा विकासाचा प्राधान्यक्रम बनला.

मंत्री श्रीपाद नाईक यांनी भाषणात भारताच्या बंदर क्षेत्राच्या विकासात पीपीपी मॉडेलने कशी महत्त्वाची भूमिका बजावली आहे यावर प्रकाश टाकला. ते म्हणाले, आपण आर्थिक पुनरुत्थानाच्या एका नव्या युगाला सुरुवात करत असताना, बंदरांच्या विकासाच्या प्रेरणेने, आम्ही खाजगी सहभागाला प्रोत्साहन देण्यासाठी पुढाकार सुव्यवस्थित करण्यासाठी उत्सुक आहोत. भारतीय बंदर क्षेत्रातील पीपीपी उपायांना आकार देण्याच्या दिशेने मोठ्या घडामोडींवर प्रकाश टाकणे तसेच भारताच्या व्यापाराच्या एकूण वाढीच्या संभाव्यतेमध्ये या प्रकल्पांमध्ये असलेल्या अफाट क्षमतेचा लाभ घेणे हा या कॉन्क्लेव्हचा उद्देश आहे. मी सर्व सागरी भागधारकांना विनंती करतो की त्यांनी या मॉडेलच्या विकासावर आणि या क्षेत्रातील आव्हानांबद्दल आपली मते मांडावीत.

जेएनपीए अध्यक्ष संजय सेठी यांनी भाषणात सांगितले की, पीपीपी मॉडेलने पायाभूत सुविधांच्या विकासाची वाढती मागणी पूर्ण करण्यासाठी मर्यादित सार्वजनिक क्षेत्रातील क्षमता वाढवल्या आहेत. पायाभूत सुविधांच्या विकासामध्ये पब्लिक-प्रायव्हेट-पार्टनरशिप मॉडेलच्या अंतर्भावामुळे आम्हाला उच्च आर्थिक विकासाचा मार्ग गाठता आला आहे. पब्लिक-प्रायव्हेट-पार्टनरशिप मॉडेलच्या अंमलबजावणीच्या २५ वर्षांमध्ये, भारतीय बंदर क्षेत्रात कार्यात्मक कार्यक्षमता, व्यवस्थापन पद्धती आणि क्षमता वाढ यामध्ये प्रगती झाली आहे.

### भागधारकांचा सहभाग

भारतातील २५ वर्षांचे पीपीपी प्रकल्प-उत्क्रांती; आणि अनुभवाची देवाणघेवाण; जागतिक दर्जाची बंदरे विकसित करणे; एमपीए कायदा आणि शुल्क वितरण-समस्या आणि चिंता; महाराष्ट्रातील भविष्यातील सागरी क्षेत्रातील प्रकल्प; महाराष्ट्रातील एनएचएलएमएल प्रकल्पांचा आढावा; मुंबई बंदरातील प्रस्तावित मरीना अशा विविध विषयांवर पॅनल चर्चा आणि सत्रांमध्ये विविध भागधारकांचा सहभाग या कॉन्क्लेव्हमध्ये पाहायला मिळाला.

# पनवेलमध्ये प्लास्टिक बंदी काटेकोरपणे

## महापालिकेची विविध पथकांद्वारे अंमलबजावणी

**पनवेल : प्रतिनिधी, वार्ताहर**

पनवेल महापालिका क्षेत्रात १ जुलै २०२२पासून एकल वापर (सिंगल युज) प्लास्टिक बंदीची कठोर अंमलबजावणी करण्यास सुरूवात करण्यात आली आहे. महापौर डॉ. कविता चौतमोल व आयुक्त गणेश देशमुख यांनी दिलेल्या निर्देशानुसार प्रतिबंधित प्लास्टिकची साठवणूक विक्री आणि वापर करणाऱ्यांवर महापालिकेच्या वतीने कठोर कारवाई करण्यात येणार आहे.

शहरातील व्यावसायिकांकडे प्रतिबंधित प्लास्टिकचा साठा असल्याची माहिती नागरिकांनी महापालिकेला द्यावी, असे आवाहन महापालिकेचे उपायुक्त कैलास गावडे यांनी केले आहे.

नागरिकांमध्ये प्लास्टिक बंदीविषयी जनजागृती निर्माण करण्याकरिता महापालिकेच्यावतीने विविध एनजीओची मदत घेतली जाणार असून नुकतीच विविध एनजीओच्या पदाधिकाऱ्यांची एक बैठक मुख्यालयात घेण्यात आली. प्लॅस्टिक बंदी बद्दल नागरिकांचे प्रबोधन करण्याकरिता या वेळी चर्चा करण्यात आली. या पदाधिकाऱ्यांनी या कामी महापालिकेला सहकार्य करण्याचे आश्वासन दिले.

प्लास्टिक बंदीची अमंलबजावणी करण्याकरिता महापालिकेच्या वतीने चारही प्रभागामध्ये विविध पथके तयार करण्यात आली आहे. ही पथके त्या त्या ठिकाणी असणाऱ्या सॅनिटरी इन्स्पेक्टरच्या नेतृत्वाखाली काम करत आहेत. या कारवाईमध्ये पहिला गुन्हा नोंद झाल्यावर पाच हजार रुपये, दुसरा गुन्हा नोंद झाल्यावर १० हजार रुपये, तिसरा गुन्हा नोंद झाल्यावर २५ हजार रुपये दंड आणि तीन महिन्याचा कारावास असणार आहे.

### ■ संबंधित उत्पादनावरही बंदी

महाराष्ट्र प्लास्टिक व थर्माकोल अधिसूचना २०१८अंतर्गत खालील अतिरिक्त एकल वापर प्लॅस्टिकचा वापर मार्च२०१८ पासूनच प्रतिबंधित आहेत. यामध्ये सर्व प्रकारच्या प्लास्टिकच्या पिशव्या (कॅरी बॅग्स) - हॅडल असलेल्या व नसलेल्या कंपोस्टेबल व प्लास्टिक (कचरा व नर्सरीसाठीच्या पिशव्या सोडून) सर्व प्रकारच्या नॉन-ओव्हन बॅग्स (पॉलीप्रोपिलीन पासून बनविलेले), एकल वापर प्लास्टिकचे उत्पादन - डिश, बाउल, कॅन्टेनर (डबे) (हॉटेलमध्ये अन्नपदार्थ पॅकेजिंगकरीता) यावरती बंदी असणार आहे. प्लास्टिकच्या कांडयासह कानकोरणी, फुग्यांसाठी प्लास्टिकचे झेंडे, आईस्क्रीम कांडया. सजावटीसाठी प्लास्टिक व पॉलिस्टीरीन (थर्माकोल) यावरती बंदी असणार आहे. प्लेटस, कप, ग्लासेस, काटे, चमचे चाकू, स्ट्रॉ, ट्रे, स्टिरर्स, मिठाईचे बॉक्स, आमंत्रण कार्ड, सिगारेटची पाकिटाभोवती प्लास्टिक फिल्म, बॅनर (१०० मायक्रॉन पेक्षा कमी) यावर बंदी असणार आहे.

# कामोठेवासीयांच्या मदतीसाठी नगरसेवक विकास घरत धावले



**पनवेल : वार्ताहर**

गेल्या काही तासांपासून पडत असलेल्या मुसळधार पावसामुळे कामोठे वसाहतीमध्ये अनेक सखल भागात पाणी तुंबले होते. या वेळी नगरसेवक विकास घरत हे तत्परतेने रहिवाशांच्या मदतीला धावले.

सिडकोच्या गलथान कारभारामुळे अनेक ठिकाणी गटारे तुंबली होती. वाढत्या पावसाच्या जोरामुळे काही झाडे सुद्धा पडली होती. वाढत्या पावसाच्या प्रवाहामुळे अनेक गटारात पाणी तुंबून घाण रस्तावर आली होती. त्यामुळे आरोग्याचा प्रश्न सुद्धा निर्माण झाला. अशा वेळी नगरसेवक विकास घरत हे त्याच्या मदतीला धावून गेले रस्त्यावर उतरून त्यांनी वसाहतीची पाहणी केली व सर्व समस्या जाणून घेतल्या पाण्याचा प्रभाव वाढल्यास त्याला पर्याय म्हणून आवश्यक ती उपाययोजना केली.

या वेळी विकास घरत यांच्यासोबत व्यापारी संघटनेचे अध्यक्ष नाना मुकादम आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी सुद्धा धाव घेऊन अनेकांना मदत केली, तसेच सिडको व महानगरपालिका अधिकारी वर्गाला तशी माहिती देत आवश्यक त्या सूचना केल्या. या वेळी विकास घरत यांनी भयभीत झालेल्या नागरिकांना दिलासा देत सर्वोतोपरी मदत करण्याचे आश्वासन दिले.

# पनवेल परिसरात मुसळधार पाऊस

**पनवेल : वार्ताहर**

गेल्या २४ तासांपासून पडत असलेल्या मुसळधार पावसाने पनवेल परिसरात चांगले झोडपून काढले आहे. पावसाळी वातावरणामुळे हवेत गारवा निर्माण झाला होता या पावसाचा आनंद बच्चे कंपनीने भिजून घेतला.

पनवेल शहरासह कामोठे, पळस्पे, कळंबोली, खारघर, करंजाडे, खांदा वसाहत आदी ठिकाणी मोठ्या प्रमाणात पाऊस झाला. साधारणपणे आतापर्यंत १७२.२० मि.मि सरासरी पाऊस पडल्याची नोंद करण्यात आली आहे. या पावसाळा सामोरे जाण्यासाठी पनवेल महानगरपालिकेमार्फत व तहसीलदार कार्यालय यांच्यातर्फे आपत्ती व्यवस्थापन कक्षची स्थापना करण्यात आली असून ०२२-२७४५२३९९, भ्रमणध्वनी - ८३६९८९९९०२ येथे संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## नवी मुंबईलाही पावसाने झोडपले

**नवी मुंबई : बातमीदार**

राज्याच्या हवामान खात्याने पुढील पाच दिवस अतिवृष्टीचा इशारा खरा ठरताना दिसत आहे. रविवारपासून सलग तीन दिवस पाऊस कोसळत आहे. नवी मुंबईतदेखील पावसाचा फटका बसल्याचे दिसून आले.

या कोसळधारेने नवी मुंबईकर मात्र चिंब झालेले पाहायला मिळाले. अनेकांची त्रेधा उडालेली पाहण्यास मिळाली. नवी मुंबईची रचना एकाबाजूला खाडी, त्यापासून तीन की. मी वर डोंगररांगा अशी आहे. त्यामुळे एकाचवेळी मुसळधार कोसळत असलेला पाऊस, डोंगरावरून शहरात वाहून येत असलेले पाणी त्यामुळे शहरात सखल ठिकाणी पाणी साठले होते, मात्र काही मिनिटांत साठलेले पाणी वाहून जाताना दिसले.

मध्यरात्रीपासून क्षणभर देखील उसंत न घेतलेल्या पावसाने नवी मुंबईला झोडपून काढले. नवी मुंबईतील शिरवणे, सानपाडा, जुईनगर व नेरूळ रेल्वे उड्डाणपूलाखाली गुडघाभर पाणी साठले होते. शहरात काही ठिकाणी फांद्या तुटण्याच्या व झाडे कोसळण्याच्या घटना घडल्या. आपत्कालीन, अग्निशमन, उद्यान व घनकचरा विभाग मात्र याबाबत सतर्क होता. या फांद्या तातडीने उचलण्यात येऊन रस्ते व पद्पथ मोकळे करण्यात आले.

# कळंबोलीत पाण्याचा निचरा होण्यासाठी भाजप पदाधिकाऱ्यांचा पाठपुरावा

**कळंबोली : रामप्रहर वृत्त**

पावसाने जोरदार हजेरी लावली आणि या अवकाळी पावसामुळे कळंबोली परिसरातील रस्त्यांवर पावसाचे पाणी साचून राहिले. यामुळे वाहनचालकांसह नागरिकांना त्रास सहन करावा लागत होता. याची माहिती भाजप कळंबोली मंडल अध्यक्ष रविनाथ पाटील यांना मिळताच त्यांनी घरचा दुखावटा विसरून लगेच महापालिका अधिकारी व कर्मचाऱ्यांना पाण्याचा निचरा होण्यासाठी पंप लावणायचे सुचना केली.

पंप चालू करून घेण्याच्या कामी रविनाथ पाटील हे तेथे स्वत: उभे होते. त्यानंतर पाण्याचा निचरा होण्यास सुरुवात झाली. या वेळी कळंबोली भाजप सरचिटणीस दिलीप बिष्ट, व्यापारी संघ अध्यक्ष कमल कोठारी, उत्तर भारतीय अध्यक्ष केशव यादव आदी उपस्थित होते.



# खारघरच्या रामशेठ ठाकूर महाविद्यालयात कॅम्पस मुलाखती



**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात करिअर मार्गदर्शन, प्लेसमेट सेल, समुपदेशन केंद्र व अंतर्गत गुणवत्ता सिदधता कक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने मंगळवारी (दि. ५) सकाळी १० ते ४ या वेळेत कॅम्पस मुलाखती घेण्यात आल्या.

कॅम्पस मुलाखती घेण्यासाठी ॲक्सीस बँकेचे सर्व पदाधिकारी महाविद्यालयाच्या कॅम्पसमध्ये आले होते. या मुलाखतीसाठी महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी व विद्यार्थिनी मुलाखतीसाठी उपस्थित होते. ॲक्सीस बँकेच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी अर्जधारकांच्या अर्जाची योग्य पध्दतीने छाननी केली व मुलाखतीसाठी पात्र असणाऱ्या अर्ज धारकांची निवड केली.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रूपेंद्र गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली करिअर मार्गदर्शन केंद्र व प्लेसमेट सेलचे समन्वयक प्रा. रेवण शिंदे, प्रा. महेश्वरी झिरपे व सर्व प्राध्यापक वृंद व कर्मचारी वर्ग या सर्वांमुळे कॅम्पस मुलाखती यशस्वीरित्या झाल्या.

कॅम्पस मुलाखतीचे आयोजन केल्याबद्दल संस्थेचे अध्यक्ष माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, उपाध्यक्ष वाय. टी. देशमुख व सचिव डॉ. सिदेश्वर गडदे यांनी आयोजकांचे कौतुक केले.

## अजिवलीतून प्रवासी बेपत्ता



**पनवेल :** तालुक्यातील अजिवली येथे एका ट्रकमधून खाली उतरलेला प्रवाशी पुन्हा परत न आल्याने तो हरवल्याची तक्रार तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. अनिल ओंमकार खर्ते (वय ३१, रा. मडगाव, मध्यप्रदेश) असे त्याचे नाव असून उंची पाच फूट चार इंच, वर्ण गोरा, केस काळे, चेहरा लांब, बांधा सरपातळ असून डाव्या हातावर माँ असे गोंदलेले आहे. त्याच्या अंगात पांढरा टीशर्ट व राखाडी पॅन्ट आहे. या व्यक्तीबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास तालुका पोलीस ठाणे किंवा पोलीस हवालदार अमोल कांबळे यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

**पनवेल : मुसळधार पावसामुळे टी पॉइंटजवळून जेएनपीटीकडे जाणाऱ्या मार्गालगत मनमोहक धबधबे निर्माण झाले आहेत.** (छाया : लक्ष्मण ठाकूर)





# पनवेलमध्ये धावत्या स्कूल व्हॅनला आग

**पनवेल : वार्ताहर**

गाडीमध्ये सीएनजी गॅस भरून पेट्रोल पंपाच्या बाहेर पडून काही अंतर पुढे गेलेल्या स्कूल व्हॅनने अचानकपणे पेट घेतल्याने परिसरात धावपळ उडाली. ही घटना मंगळवारी (दि. ५) दुपारी घडली आहे.

नवीन पनवेल उड्डाण पुलाखाली असलेल्या सीएनजी पंपामध्ये दुपारी ३ च्या सुमारास स्कूल व्हॅन (एमएच ४६ जे ०३०१) ही गाडी घेऊन चालक गॅस भरण्यासाठी गेला. त्यानंतर गाडी बाहेर काढून चालक थोडा पुढे गेला असता अचानक त्या गाडीने पेट घेतला. या वेळी परिसरातील नागरिकांनी अग्निशमक दलाला घटनास्थळी प्राचारण केले व त्यांनी आग आटोक्यात आणली. या लागलेल्या आगीमध्ये गाडीचे मोठे नुकसान झाले आहे. आग कशामुळे लागली याचे कारण अद्याप स्पष्ट झाले नाही आहे.

## राम प्रहर अर्थसाक्षर स्पर्धा : २६

**अर्थसाक्षर स्पर्धेचे तीन प्रश्न खाली दिले आहेत.**

**वाचक स्पर्धकांनी निवडलेली बरोबर उत्तरे पुढील पाच दिवसांत म्हणजेच गुरुवारी रात्री ८ वाजेपर्यंत 'राम प्रहर'च्या ७७३८१०६००९ या मोबाईल क्रमांकावर कळवावी (व्हॉट्सॲप, मेसेज अथवा malharnetwork2022@gmail.com यावर मेल केले तरी चालेल).**

**१. टाटा उद्योग समूहातील सर्वात मोठ्या माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील कंपनीचे नाव काय आहे?**

*अ.* टाटा एलेक्सी — *आ.* टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस (टीसीएस)
*इ.* टाटा टेलिसर्व्हिसेस लिमिटेड — *ई.* टाटा सन्स लिमिटेड

**२. आपल्या देशातील सर्वाधिक बाजारमूल्य असलेली कंपनी कोणती?**

*अ.* रिलायन्स इंडस्ट्रीज — *आ.* टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस (टीसीएस)
*इ.* इन्फोसिस — *ई.* एल ॲड टी

**३. शेअर बाजाराच्या सेन्सेक्स इंडेक्समध्येकिती कंपन्यांचा समावेश आहे?**

*अ.* १०० — *आ.* ३०
*इ.* ५० — *ई.* १०

Save More - Get Pure
E-store India
India's Widest SWADESHI Supermarket
India's Next Retail Revolution
BEST PRICE SUPERMARKET
ASSURED MINIMUM 4% OFF ON ALL PRODUCTS
UPTO 33% OFF
Sai Sarang Co-op Society, Shop No.1&2, Momin Pada, Tapal Naka,Old Panvel, Pin - 410 206.

**टीप :** वरील तीनही प्रश्नांची अचूक उत्तरे देणाऱ्या वाचकांमधून पहिल्या तीन क्रमांकांची निवड संगणक प्रणालीने करण्यात येईल. या तीनही विजयी वाचकांना पनवेल, टपाल नाका येथील 'ई-स्टोर इंडिया'तर्फे गिफ्ट व्हाऊचर्स देण्यात येतील, तसेच सर्व विजयी वाचक स्पर्धकांची नावे पुढील रविवारी अर्थ प्रहर सदरात जाहीर करण्यात येतील.

**...तर मग चला लागा तयारीला आणि अर्थसाक्षर स्पर्धेत यशस्वी व्हा!**

## संपादकीय

# स्वागताच्या तुताऱ्या

वंदनीय हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांना दैवत मानणारी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची शिवसेना आणि भारतीय जनता पक्षाचे चतुरस्त्र नेते उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील नवे सरकार अजून पूर्णत्वाने स्थापन व्हायचे आहे. तरीही या नव्या सरकारच्या स्वागतासाठी महाराष्ट्रभरातील दोन्ही पक्षांचे कार्यकर्ते उत्साहाने जल्लोष करताना दिसत आहेत.

**आठवडाभरापूर्वी ज्यांना पळपुटे, बंडखोर असे हिणवले जात होते, त्या शिवसेनेच्या आमदारांना त्यांच्या मतदारसंघातील नागरिकांनी जणु नायकत्व बहाल केले आहे. शिंदे-फडणवीस या जोडीचा नुकताच शपथविधी झाला. त्यानंतर विधानसभा अध्यक्षपदाची निवडणूक पार पडली. पाठोपाठ शिंदे-फडणवीस सरकारवरील विश्वासदर्शक ठरावही प्रचंड मोठ्या मताधिक्याने पारित झाला. कमी काळात घटना इतक्या वेगाने घडल्या की मंत्रिमंडळाची रचना किंवा खात्यांचे वाटप याबाबत चर्चा करण्यासाठी दोन्ही नेत्यांना उसंतदेखील मिळाली नाही. शपथविधी झाल्यानंतर हे दोन्ही जबाबदार नेते वेळ न वाया घालवता कामाला लागले. मंत्रिमंडळाच्या पहिल्याच बैठकीत पीकपाणी आढावा आणि अन्य मोठ्या प्रकल्पांच्या संदर्भात गांभीर्यपूर्वक चर्चा करण्यात आली. विशेषत: अडीच वर्षे अडकून पडलेला मुंबईतील मेट्रो कारशेडचा प्रकल्प मार्गी लावण्याच्या दृष्टीने निर्णय घेण्यात आले. मधल्या काळात मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री आपापल्या मतदारसंघात जाऊ शकले नव्हते. तसेच गेले दोन आठवडे सुरत, गुवाहाटी, गोवा असे फिरणारे शिवसेनेचे आमदार घरी जाऊ शकले नव्हते. विश्वासदर्शक ठराव जिंकल्यानंतर ही सर्व मंडळी आपापल्या मतदारसंघात गेली. तेथे त्यांचे जंगी स्वागत करण्यात आले. याच आमदारांना माजी पर्यटनमंत्री आदित्य ठाकरे यांनी मतदारांच्या नजरेला नजर कशी भिडवणार? कडेकोट बंदोबस्तात हॉटेलमध्ये किती वास्तव्य करणार, असे प्रश्न विचारले होते. शिवसेनेत उठाव करणाऱ्या या आमदारांचे त्यांच्या मतदारसंघात एवढे प्रचंड स्वागत झाले हे आता डोळे भरून पाहणे भाग आहे. उठाव करणाऱ्या आमदारांना जनतेच्या रोषाला तोंड द्यावे लागेल अशीच ठाकरे समर्थकांची अटकळ होती. तसे बोललेदेखील जात होते, परंतु प्रत्यक्षात ती अटकळ नसून इच्छा होती हे आता त्यांच्या लक्षात आले असेल. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे त्यांची कर्मभूमी असलेल्या ठाणे शहरात अभूतपूर्व स्वागत झाले. रात्री उशिरापर्यंत ठाण्यातील धर्मवीर आनंद दिघे यांच्या स्मृतीस्थळापाशी जल्लोष सुरू होता. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंगळवारी सकाळी नागपूर गाठले. विमानतळ ते त्यांचे निवासस्थान एवढे लांब अंतर फडणवीस दाम्पत्याची शानदार मिरवणूक काढण्यात आली. त्यांच्या स्वागतासाठी हजारो भाजप कार्यकर्त्यांचा जमाव जमला होता. ''काय झाडी, काय डोंगार, काय हाटेल, ओक्केमध्ये आहे'' या डायलॉगमुळे राष्ट्रीय पातळीवरील प्रसिद्धी लाभलेले सांगोल्याचे आमदार शहाजी बापू पाटील यांचे जोरदार स्वागत करण्यात आले. आणखी एक नेते संदिपान भुमरे यांचे औरंगाबाद विमानतळावर तसेच प्रचंड स्वागत करण्यात आले. अडीच वर्षांच्या कालखंडानंतर महाराष्ट्राच्या १३ कोटी जनतेला हवे असलेले सरकार अखेर सत्तेवर आल्याची भावना या स्वागत सोहळ्यांमधून स्पष्टपणे दिसून येत होती. अर्थात, स्वागताचे हारतुरे लवकरात लवकर आटोपते घेऊन कामाला लागण्याची जबाबदारी नव्या सरकारवर आली आहे. ती ते व्यवस्थित पार पाडतील याची जनतेला खात्री वाटते. स्वागताच्या तुताऱ्यांचा तोच अर्थ आहे. महाराष्ट्रासाठी पुन्हा एकदा 'अच्छे दिन' आले आहेत.**

# विकासात युवकांना प्राधान्य देणारी पनवेल महापालिका





पनवेल महापालिका एक ऑक्टोंबर २०१६मध्ये स्थापन झाली. त्यानंतर झालेल्या निवडणुकीत लोकनेते रामशेठ ठाकूर व आमदार प्रशांत ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली भारतीय जनता पक्षाची सत्ता महापालिकेत आली. डॉ. कविता चौतमोल पहिल्या महापौर झाल्या. परेश ठाकूर यांची सभागृह नेतेपदी निवड करण्यात आली. त्यांच्या नेतृत्वाखाली महापालिकेचा कारभार करताना देशाचे भवितव्य असलेल्या युवकांना ही प्राधान्य देण्यात येत आहे. पनवेल शहराचा विकास करताना युवकांसाठी शिक्षण, आरोग्य, सांस्कृतिक आणि क्रीडा सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी महापालिका काम करीत असल्याचे दिसून येत आहे.

लोकनेते रामशेठ ठाकूर विकास मंडळाच्या माध्यमातून मल्हार नाट्य करंडकाच्याद्वारे रायगड जिल्हास्तरीय नाट्य स्पर्धा सुरू केली. स्थानिक कलाकारांना प्रोत्साहन देणे, कलेला उत्तेजन देऊन कलेची सेवा करणे. पनवेल क्षेत्रात जास्तीत जास्त नाट्य संस्कृतीचा प्रचार व्हावा यासाठी प्रयत्न करणे या प्रामाणिक हेतूने ही स्पर्धा सुरू करण्यात आली. २०१४ मध्ये राज्यातील इतर जिल्ह्यांपर्यंत पोहचण्यासाठी अखिल भारतीय नाट्य परिषदेचे पनवेल तालुका अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या सूचनेनुसार अटल करंडक राज्यस्तरीय नाट्य स्पर्धा सुरू करण्यात आली. त्यामुळे पनवेलकरांना दर्जेदार नाटके पाहायला मिळाली. इथल्या कलाकारांना नामवंत कलाकारांचे मार्गदर्शन मिळाले. त्यामुळे अनेकांना चांगली संधी मिळाली.

पनवेल महानगरपालिके तर्फे विविध क्षेत्रात विकास कार्यक्रम राबविले जात आहेत. नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र, प्रभाग कार्यालये यांच्या बरोबरीने महापालिका क्षेत्रातील नागरिकांचे आरोग्य तंदुरूस्त रहावे या विचाराने विविध क्रीडा संकुले बांधण्यात येत आहेत. महापालिका क्षेत्रात उद्याने, मैदाने विकसित करून येथील शाळा व महाविद्यालयात शिक्षण घेणारे अनेक विद्यार्थी महाविद्यालयीन व राज्य पातळीवर विविध खेळात चमकताना पाहायला मिळतात. त्यांच्यासाठी विविध खेळांचे प्रशिक्षण देण्यात येणार आहे. तसेच आंतरराष्ट्रीय दर्जाचे प्रशिक्षण देणारी संस्था असावी या विचाराने नवीन पनवेल येथे आंतरराष्ट्रीय दर्जाचे क्रिकेट प्रशिक्षण केंद्र उभारण्याचा निर्णय घेण्यात आला. महानगरपालिका हद्दीतील सेक्टर ११, नवीन पनवेल (पूर्व) आदई सर्कल जवळ आंतरराष्ट्रीय दर्जाचे क्रिकेट प्रशिक्षण केंद्र महापालिकेच्यावतीने लवकरच उभारण्यात येणार आहे. प्रसिध्द किक्रेटपटू दिलीप वेंगसरकर यांच्या संस्थेची निवड यासाठी करण्यात आली आहे. या प्रशिक्षण केंद्रामध्ये प्रशिक्षण देण्यासाठी मे. दिलीप वेंगसरकर फाउंडेशनशी करार करण्यात आला. या मुळे आंतरराष्ट्रीय दर्जाचे क्रिकेट खेळाडू तयार व्हावे, यासाठी महापालिकेने पुढाकार घेतला आहे. पनवेल शहर आणि तालुक्यातील क्रिकेटवीरांसाठी प्रशिक्षण घेण्यासाठी मुंबई व इतरत्र जावे लागते. महापालिका उभारत असलेल्या आंतरराष्ट्रीय दर्जाचे क्रिकेट प्रशिक्षण केंद्रामुळे नागरिकांची ही अडचण दूर होणार आहे. या प्रशिक्षण संस्थेमध्ये प्रत्येकवर्षी १० ते १९ वयोगटातील किमान १०१ विद्यार्थ्यांना विनामुल्य प्रशिक्षण देण्यात येणार आहे. यामधील पन्नास टक्के पनवेल महापालिका क्षेत्रातील, २५ टक्के महापालिका क्षेत्र वगळून रायगड जिल्ह्यातील विद्यार्थी आणि २५ टक्के महाराष्ट्रातील इतर जिल्ह्यातील विद्यार्थी असणार आहेत. पनवेल क्षेत्रातील अनेक मुलांमध्ये क्रिकेटचे टॅलेंट आहे. पनवेल महापालिकेमुळे व्यासपीठ उपलब्ध होणार असल्याचे मे.दिलीप वेंगसरकर फाउंडेशनशी करार करताना विख्यात क्रिकेटपटू दिलीप वेंगसरकर यांनी सांगितले. तर दिलीप वेंगसरकर यांच्या सहकार्याने पनवेलमध्ये उभारण्यात येणार्या आंतरराष्ट्रीय दर्जाच्या क्रिकेट प्रशिक्षण केंद्राचा लाभ घेऊन येथून आंतरराष्ट्रीय क्रिकेट खेळाडू तयार होऊन पनवेल महापालिका आंतरराष्ट्रीय नकाशावर जाईल असा विश्वास सभागृह नेते परेश ठाकूर यांनी व्यक्त केला आहे.

### खेळाडूंना जास्त संधी मिळेल -प्रतिक मोहीते

*पनवेलमध्ये आंतरराष्ट्रीय दर्जाचे क्रिकेट प्रशिक्षण केंद्र मे.दिलीप वेंगसरकर फाउंडेशन तर्फे सुरू होणार ही आनंदाची बाब आहे. पनवेलमधील अनेक मुलामुलींना त्याचा फायदा होईल. आमच्या प्रशिक्षण केंद्रातील मुलांची निवड रायगडच्या संघात झाली आहे. नताशा शर्माची निवड १९ वर्षाखालील रायगडच्या मुलींच्या संघात झाली आहे. तिची खेळण्याची पध्दत पाहून भारताची महिला क्रिकेट खेळाडू शेफाली वर्माच्या बायोग्राफीमध्ये शेफालीच्या लहानपणीच्या भूमिकेसाठी निवड करण्यात आली. क्रिश बहिरा व पार्थ पवार यांची महाराष्ट्र प्रशिक्षण केंद्रात निवड झाली आहे. खारघर पर्यंतचा भाग एमसीएमध्ये आहे. आमदार प्रशांत ठाकूर आणि परेश ठाकूर यांनी दिलीप वेंगसरकर यांच्या सहकार्याने पनवेलला एमसीएमध्ये समाविष्ट करून घेतले तर या खेळाडूंना जास्तीत जास्त स्पर्धा खेळण्याचा अनुभव मिळेल. तसेच त्याचा त्यांना फायदाही होईल, यासाठी प्रयत्न होणे गरजेचे असल्याचे प्रशिक्षक पनवेल क्रिकेट ॲकेडमीचे प्रतिक मोहिते यांनी बोलताना सांगितले.*

### खेळाला महत्त्व द्या -दिलीप वेंगसरकर

*माझे घरच वाजे-वाजापूर येथे असल्याने मी अनेक वेळा पनवेलला येत असतो. येथील मुलांचा खेळ पाहतो पनवेलच्या मुलांमध्ये क्रिकेटचे टॅलेंट आहे. त्यांना व्यासपीठ तसेच त्यांना योग्य मार्गदर्शन मिळाले तर ही मुले आयपीएलसह विविध स्पर्धात निश्चित चांगली कामगिरी करतील असा माझा ठाम विश्वास आहे. मी स्वत: आठवड्यातून दोन ते तीन वेळा येणार आहे. एमसीएमध्ये रायगडच्या मुलांना सदस्यत्व मिळाले तर त्यांना खूप फायदा होईल. मी स्वत: आठवड्यातून दोन ते तीन वेळा येणार आहे. खेळामुळे आरोग्य चांगले राहते. मुलांनी खेळाबरोबरच शिक्षणालाही तेवढेच महत्व दिले पाहिजे असे विख्यात क्रिकेटपटू दिलीप वेंगसरकर यांनी म्हटले आहे.*

**कामाचे अंदाजित खर्च- रक्कम रु. ८,८४,३०,८१०/-**
**भूखंडाचे क्षेत्रफळ- २९,८९९ चौ. मी.(७.४७ एकर)**
**कामाचे स्वरुप- १५० मी. व्यासाचे क्रिकेट मैदान,पॅव्हेलियन इमारत**
**प्रशिक्षण केंद्र- ४२१ चौ. मी. (४५२९.९६ चौ फुट )**
**वाहनतळ क्षमता- ३१ चार चाकी वाहने, ४० दुचाकी वाहने व २ बस**
**प्रशिक्षण संस्था- मे. दिलीप वेंगसरकर फाउंडेशन**

**खबरबात**
**नितीन देशमुख**



## बदलते तंत्रज्ञान




### आधारकार्डालाही वैधता डेट असते, जाणून घ्या...

क्रेडिट कार्ड किंवा डेबिट कार्ड प्रमाणेच आधारकार्डालाही एक्सपायरी डेट असते. शाळेमध्ये ॲडमिशन घ्यायचे असेल, बँकेत खाते सुरु करायचे असेल किंवा एखादी स्पर्धात्मक परीक्षा द्यायची असेल, आजकाल कोणत्याही महत्त्वाच्या कामासाठी आधारकार्ड हे एक महत्त्वाचे दस्तावेज झाले आहे. प्रत्येक ठिकाणी आपल्याला आधारकार्डची गरज भासते. मात्र तुम्हाला माहित आहे का? क्रेडिट कार्ड किंवा डेबिट कार्ड प्रमाणेच आधारकार्डालाही एक्सपायरी डेट असते. आधार कार्ड हे एक दस्तऐवज आहे, ज्यामध्ये भारतीय नागरिकाच्या ओळखीशी संबंधित सर्व माहिती असते. आधार क्रमांक १२ अंकी असतो. आज आपण जाणून घेऊया की आधार कार्ड किती काळापर्यंत वैध असते. आधार कार्ड किती काळापर्यंत वैध आहे? जर तुम्ही प्रौढ असाल तर तुमच्या नावाने जारी केलेले आधार कार्ड कायमचे वैध असेल. त्या व्यक्तीच्या मृत्यूनंतर त्याचे आधार कार्ड अवैध ठरते. जर मुलाचे वय ५ वर्षांपेक्षा कमी असेल तर त्याला पाच वर्षांपर्यंत निळे आधार कार्ड दिले जाते.

आधार कार्डची वैधता कशी तपासायची? युआयडीएआयची अधिकृत वेबसाइट https://uidai.gov.in/ ला भेट द्या. होमपेजवर दिलेल्या आधार सेवा पर्यायावर जा. आता व्हेरीफाय आधार नंबर पर्यायावर जा. तुम्ही त्यावर क्लिक करताच एक नवीन पेज उघडेल. येथे तुमचा आधार क्रमांक टाका. सुरक्षा कोड टाका आणि व्हेरीफाय वर क्लिक करा. त्याचे स्टेटस तुमच्या मोबाईलवर येईल. सध्या आधारकार्ड हे अनेक महत्त्वाच्या दस्तावेजापैकी एक आहे. तुम्ही घरातून कोणत्याही महत्त्वाच्या कामासाठी बाहेर पडा. तुम्हाला कधी आधारकार्ड लागेल हे सांगता येत नाही. त्यामुळे ते बरोबर हे ठेवायलाच लागते. आधारकार्ड हे एक आज महत्त्वाचे दस्तावेज झाले आहे. या मुळे आधार कार्ड काढून गप्प न बसता त्याची एक्सपायरीही चेक करणे तेवढेच महत्त्वाचे आहे. मुलांना तर आज शाळेतही आधारकार्ड विचारले जाते. यामुळे इकडे लक्ष देणे गरजेचे आहे.

# राष्ट्रीय एकात्मतेचे प्रेरणास्थान डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी



भारतमातेच्या स्वातंत्र्यानंतर हे स्वातंत्र्य अबाधित ठेवणे, राष्ट्रीय एकात्मता व अखंडता जपणे व वैविध्याने नटलेल्या या भारतमातेला एक राष्ट्र म्हणून एकसंध ठेवणे, यासाठी डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांनी दिलेले मोलाचे योगदान महत्त्वाचे आहे. डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांचा जन्म कोलकाता येथे ६ जुलै १९०१ रोजी झाला. लहानपणापासूनच शिक्षणात प्राविण्य मिळविणाऱ्या श्यामाप्रसाद मुखर्जी यांनी सरस्वतीमातेचीच सेवा करण्याचा दृढनिश्चय केला होता. त्यामुळे इंग्लंड येथे 'बॅरिस्टर'चे शिक्षण घेण्यासाठी गेलेल्या श्यामा प्रसादजींनी तेथील शिक्षणप्रणालीचा अभ्यास केला व त्यानुसार भारतीय शिक्षणप्रणालीमध्ये सुधारणा घडवून आणण्यासाठी ते भारतात परत आले. वयाच्या अवघ्या ३३व्या वर्षी ते कोलकाता विश्वविद्यालयाचे कुलगुरू बनले. ही खूप अभिमानाची बाब होती.

शिक्षण क्षेत्रात कार्य करून सामाजिक सुधारणा घडवू इच्छिणाऱ्या श्यामाप्रसाद मुखर्जी यांची खरी गरज ही राजकारणात अधिक आहे, हे जणू खुद्द नियतीनेच ठरवले होते. तत्कालीन पश्चिम बंगालमधील हिंदू समाजाची परिस्थिती पाहता, श्यामाप्रसाद मुखर्जी यांचे राजकारणातील आगमन हे किती निकडीचे होते, याचा प्रत्यय आल्यावाचून राहणार नाही. ब्रिटिशांच्या सहाय्याने मुस्लीम लीगकडून हिंदू जनतेवर प्रचंड अन्याय-अत्याचार केला जात होता. मूलभूत हक्कही हिंदू जनतेला नाकारले जात होते. हिंदू समाजाची ही वाताहत थांबविण्यासाठी एन. सी. चॅटर्जी, आशुतोष लिहाडी, जस्टिस मन्मथनाथ मुखर्जी आणि 'भारत सेवाश्रम संघा'चे संस्थापक स्वामी प्रणवानंद महाराज यांनी डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांना सक्रिय राजकारणात उतरण्यासाठी प्रोत्साहित केले.

राजकारणात प्रवेश केल्यावर अल्पावधीतच श्यामाप्रसाद मुखर्जी हे 'राष्ट्रीय

**निमित्त**

नेते' म्हणून ओळखले जाऊ लागले. राष्ट्रपिता महात्मा गांधी हेसुद्धा श्यामाप्रसाद मुखर्जी यांच्या प्रखर राष्ट्रवादी व विचाराने प्रभावित झाले होते. त्यामुळेच पंडित मदन मोहन मालवीय यांच्यानंतर हिंदू समाजाचे नेतृत्व करण्यासाठी तुमच्यासारख्या नेत्यांची देशाला गरज आहे, अशा शब्दांत त्यांनी डॉ. मुखर्जी यांची प्रशंसा केली होती. एवढेच नव्हे, तर महात्मा गांधी यांच्या आग्रहाखातर स्वतंत्र भारताच्या पहिल्या केंद्रीय मंत्रिमंडळात त्यांचा समावेश करण्यात आला होता.

हिंदू समाजाचे नेतृत्व करणारे नेते या नात्याने जरी डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी हे राजकारणात आले असले तरी हिंदू जनतेच्या न्याय्य हक्कासाठी मुस्लीम वा इतर धर्मीय बांधवांवर अन्याय होईल, असे कोणतेच निर्णय किंवा धोरण त्यांनी राबविले नव्हते. त्यांचा उद्देश व विचार हा स्वच्छ होता.

१९४१मध्ये बंगालमध्ये कृषक प्रजा पार्टी व कॉंग्रेसची सत्ता आली. या सत्तेमध्ये डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी हे एकमेव हिंदू नेते होते. या कॅबिनेटची कार्यप्रणाली जनमानसात एवढी लोकप्रिय झाली की 'श्यामा-उल' या नावानेच या कॅबिनेटला ओळखले जाऊ लागले. या सत्ताकाळात हिंदूंवरील अत्याचार थांबले. जो न्याय, जो व्यवहार मुस्लीम व्यक्तीसोबत केला जायचा, तोच व्यवहार हिंदू बांधवांसोबत केला जाऊ लागला. एक आश्वस्तता हिंदू समाजामध्ये येऊ लागली. हिंदू बांधवांना त्यांचे न्याय्य हक्क मिळू लागले. मुस्लीम समाजामध्येसुद्धा डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांच्याप्रति आदर वाढला. आपले नेते, मुस्लीम समाजाचे हिंतचिंतक अशी भावना मुस्लीम बांधवामध्ये रूजू होऊ लागली. डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांच्या या कार्यपद्धतीमुळे बंगालसारख्या राज्यात हिंदू-मुस्लीम समाजातील ऐक्य दिसून येऊ लागले. प्रथमच ब्रिटिशांच्या 'फोडा आणि राज्य करा' या नीतीला तडा गेला होता. ब्रिटिश, समाजकंटकांनाही अपयश आले होते. मात्र, हिंदू-मुस्लीम समाजातील हे ऐक्य पाहता तत्कालीन ब्रिटिश गव्हर्नर हर्बर्ट यांनी त्यांच्या अधिकारांचा गैरवापर करून हे मंत्रिमंडळ बरखास्त केले.

**-फ्रेडी डिकोस्टा-गोन्सालवीस**

**(छाया : लक्ष्मण ठाकूर)**




**पनवेल : जोरदार पाऊस पडू लागला की रस्त्यावरुन चालणेही मुश्किल होते. पायीच काय दुचाकीवरुन जातानाही असा छत्रीचा आधार लोक घेताना दिसतात.**

## आरोग्य प्रहर

### इअरफोनमुळे चक्क बहिरेपणा येतो; जाणून घ्या लक्षणे...

सध्या प्रत्येकाच्या हातात मोबाईल दिसतो आणि त्यातही प्रत्येकाच्या कानात इअरफोन घातलेले दिसतात. व्हिडिओ पाहणे आणि ऑडिओ ऐकण्याव्यतिरिक्त कॉलवर बोलण्यासाठीसुद्धा इअरफोनचा वापर केला जातो. पण तुम्हाला माहिती आहे का हा छोटासा इअरफोन तुम्हाला बहिरे बनवू शकतो आणि चक्क एका देशात असे घडले आहे. जिथे एक चतुर्थांश लोकसंख्या कानात इअरफोन वापरल्यामुळे बहिरे होत आहे. चला या देशाविषयी जाणून घेऊया. इअरफोनमुळे फ्रान्समधील २५ टक्के लोकांची ऐकण्याची क्षमता कमी झाली.



नॅशनल इन्स्टिटयूट ऑफ हेल्थ अँड मेडिकल इन्स्टिट्यूटने केलेल्या संशोधनात असा दावा करण्यात आला आहे की फ्रान्समधील चारपैकी एका व्यक्तीला ऐकण्याच्या समस्या आहेत. फ्रान्समध्ये एवढ्या मोठ्या प्रमाणावर संशोधन होण्याची ही पहिलीच वेळ आहे. ज्यामध्ये १८ ते ७५ वर्षे वयोगटातील सुमारे ४६० लोकांचा समावेश होता. सोशल आइसोलेशन, डिप्रेशन आणि मोठ्या आवाजात संगीत ऐकणे यामुळे ऐकण्याची क्षमता कमी होण्याचा दावा केला जातोय. इअरफोनचा जास्त वापर कराल तर ही लक्षणे दिसतील. यात कान दुखणे-मोठ्या आवाजात म्युझिक ऐकायला खूप मजा येते. पण ही मजा तुमच्यासाठी शिक्षाही बनू शकते. मोठ्या आवाजात गाणे ऐकून आणि इतर लोकांशी इअरफोन शेअर केल्याने जर्म्स एका व्यक्तीकडून दुसऱ्या व्यक्तीच्या कानापर्यंत पोहोचतात. त्यामुळे कानाला संसर्ग होण्याचा धोका वाढतो. जास्त वेळ इअरफोन वापरल्याने कानात घाण साचते. त्यामुळे अनेकवेळा कानात इन्फेक्शन, ऐकण्याची समस्या आणि कानात आवाज येण्याच्या समस्या आढळतात. २.हृदयरोग-मोठ्या आवाजात म्युझिक ऐकल्याने कानावरच नाही तर हृदयावरही वाईट परिणाम होतो. जेव्हा मोठ्या आवाजात म्युझिक ऐकले जाते तेव्हा हृदयाचे ठोके वाढतात. जे दीर्घ काळानंतर तुमच्या हृदयासाठी हानिकारक ठरू शकतात. ३.ऐकायला कमी येणे किंवा बहिरेपणा-इयरफोनचा जास्त वापर केल्याने ऐकण्याच्या क्षमतेवर परिणाम होतो. संशोधनानुसार, तासन्‌तास इअरफोन वापरल्याने चक्कर येणे, निद्रानाश, डोकेदुखी आणि कान दुखणे यांसारखी लक्षणे दिसू शकतात. आपल्या कानाची ऐकण्याची क्षमता ९० डेसिबल असते, हे लक्षात ठेवले पाहिजे.

# मुरुड तालुक्यात तुफान पाऊस

## काही ठिकाणी पाणी साचले

**मुरुड : प्रतिनिधी**

जुलै महिन्याच्या पहिल्या दिवसापासून मुरुड तालुक्यात पाऊस पडत आहे. सोमवारी (दि. ४) एका दिवसात ११६मि.मि. पावसाची नोंद झाली आहे. आतापर्यंत मुरुड तालुक्यात सरासरी ८३९मिमि पाऊस कोसळला आहे.

मुरुड तालुक्यात गेल्या दोन दिवसांपासून मुसळधार पाऊस पडत असल्याने जनजीवन विस्कळीत झाले. तालुक्यातील छोटे-मोठे धबधबे प्रवाहीत झाले आहेत. मुरुड शहरातील दत्तवाडी, लक्ष्मीखार व गोलबंगला परिसरात मोठ्या प्रमाणात पाणी साचले आहे. तर अनेक शेतात पाणी साचल्याने राब खराब होण्याची शक्यता आहे. पावसाचा जोर वाढत असल्याने नागरिकांना घराबाहेर न पडण्याचे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

मंगळवार सकाळपासून जोरदार पाऊस पडत असल्याने मुरुड तालुक्यातील माध्यमिक व प्राथमिक शाळा लवकर सोडण्यात आल्या. बोर्ली येथे महावितरणचा विजेचा खांब पडल्याने काही तास वीज पुरवठा खंडित झाला होता. महावितरणाने सदरचा खांब बदलला. सकाळपासून पडणाऱ्या पावसापासून कोणतीही जीवित अथवा आर्थिक नुकसान झालेले नाही. मात्र संततधार पाऊस असल्याने लोकांनी बाजारपेठेत खरेदीसाठी जाणे टाळले.

त्यामुळे बाजारपेठेत शुकशुकाट दिसून आला आहे. एसटी वाहतूक सुरळीत सुरु होती. भात पिकाला पोषक असा पाऊस पडत असल्याने शेतकऱ्यांकडून समाधान व्यक्त करण्यात येत आहे.





## नेरळच्या धामोते रस्त्यावर दोन फूट पाणी

**कर्जत : बातमीदार**

पहिल्याच मोठया पावसात नेरळ- कळंब रस्त्यावरून पाणी वाहत आहे. त्यामुळे अनेक वाहने अडकून पडली तर स्थानिकांना आपल्या घरात कोंडून घेण्याची वेळ आली. सतत दोन दिवस ही परिस्थिती निर्माण झाल्याने स्थानिक आणि परिसरातील ३५ गावातील लोकांचे हाल झाले.

नेरळ-कळंब रस्त्यावरील धामोते गावाच्या हद्दीत मोठ्या प्रमाणावर बांधकामे झाली आहेत. सदर बांधकामे करताना मोठ्या प्रमाणात मातीचा भराव टाकून जमीन सपाट करून घेण्यात आली आहे. या भरावामुळे पाण्याचा निचरा होत नसल्याने एक तास पाऊस झाला तरी रस्त्यावरून पाणी जाऊन वाहतूक बंद पडते. सोमवारी रात्रीपासून सुरू असलेल्या संततधार पावसाने संपूर्ण धामोते परिसर जलमय झाला आहे. ते सर्व पाणी नेरळ-कळंब रस्त्यावर आले असून वाहतूक खोळंबून राहत आहे.

नेरळ-कळंब रस्त्याने परिसरातील ३० हुन अधिक गावातील लोकांची वाहतूक सुरू असते. सोमवारी (दि. ४) या भागात काही तास पाऊस झाला आणि रस्त्यावरून पाणी वाहू लागले. त्यामुळे संध्याकाळी घरी परतणारे विद्यार्थी व नोकरदारांना काही तास ताटकळत राहावे लागले, तर काहींनीं बोपेले येथून तळवडे पुलावरून कळंब रस्त्याचा पर्याय निवडला.

मंगळवारी दिवसभर पावसाची संततधार सुरू असल्याने धामोते भागातील रस्त्यावरून सतत पाणी वाहून जात होते.

## तिलोरे गावाजवळ टेम्पो व कारची धडक

### एक ठार, दोन जण जखमी

**माणगाव : प्रतिनिधी**

मुंबई-गोवा महामार्गावर माणगाव तालुक्यातील तिलोरे गावाच्या हद्दीत सोमवारी (दि. ४) मध्यरात्री टेम्पो ट्रॅव्हलर व वॅगनार कारमध्ये धडक झाली. या अपघातात एक जण ठार व दोघे जखमी झाले.

अक्षय घोले (रा. वणवशी, ता. दापोली) हा त्याच्या ताब्यातील टेम्पो ट्रॅव्हलर (एमएच-४८,सीबी-३५७७) मध्ये प्रवासी घेवून मुंबई-गोवा महामार्गावरून मुंबई बाजूकडे जात होता. तिलोरे गावाच्या हद्दीत मुंबई बाजूकडून येणाऱ्या वॅगनर कार (एमएच-४७,एन-३९१९)ने राँगसाईडला जाऊन टेम्पो ट्रॅव्हलरला धडक दिली.

या अपघातात वॅगनर कारमधील शशिकांत पांडुरंग पांचाळ हे जागीच ठार झाले तर कार चालक सुरेश परब (रा. मालाड मुंबई) व साधना मेस्त्री यांना लहान मोठ्या दुखापती झाल्या. या अपघात प्रकरणी कार सुरेश परब यांच्या विरूद्ध माणगाव पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास उपनिरीक्षक अस्मिता पाटील करीत आहेत.





## भाजपतर्फे कर्जतमध्ये पाऊलवाटा पुस्तिकेचे वाटप

**कर्जत : बातमीदार**

भारतीय जनता पक्षाच्या माध्यमातून करिअर मार्गदर्शनासाठी 'पाऊलवाटा' या पुस्तिकेची निर्मिती करण्यात आली आहे. या पुस्तिकेत दहावी आणि बारावीनंतर विविध १५० कोर्सेसची माहित देण्यात आली आहे. भाजपच्या कार्यकर्त्यांनी कर्जत तालुक्यातील विविध शाळेत जाऊन सुमारे ५०० विद्यार्थ्यांना 'पाऊलवाटा' या पुस्तिकेचे वाटप केले.

सुनील गोगटे त्यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून प्रकाशित करण्यात आलेली पाऊलवाटा ही पुस्तिका विद्यार्थ्यांना मार्गदर्शक असल्याचे प्रतिपादन मुख्याध्यापिका अश्विनी साळोखे यांनी या वेळी केले.

भाजप किसान मोर्चाचे कोकण संपर्क प्रमुख सुनील गोगटे, दिनेश सोळंकी, माजी शहर अध्यक्ष विजय कुलकर्णी, महिला मोर्चाच्या तालुका अध्यक्ष स्नेहा गोगटे, मुख्याध्यापिका अश्विनी साळोखे, वृषाली वैद्य, शारदा मंदिरचे नंदू मणेर, आप्पा ओक, मधुकर गांगल, अभिनव ज्ञान मंदिरचे शिंदे, वैशंपायन यांच्या हस्ते पाऊलवाटा या पुस्तिकेचे विद्यार्थ्यांना वाटप करण्यात आले.



## सर्वोच्च न्यायालयाच्या निकालानंतर महाराष्ट्राला वेगळी दिशा मिळेल -आमदार महेंद्र दळवी

**अलिबाग : प्रतिनिधी**

सर्वोच्च न्यायालयाच्या १२ तारखेच्या निर्णयानंतर महाराष्ट्राला वेगळी दिशा मिळेल, असे मत अलिबागचे आमदार महेंद्र दळवी यांनी व्यक्त केले.



मुख्यमंत्री एकनाथ शिंदे गटाचे अलिबागचे आमदार महेंद्र दळवी हे नवीन सरकार स्थापन झाल्यानंतर सोमवारी (दि. ४) रात्री उशिरा अलिबाग येथे दाखल झाले. त्यांचे कार्यकर्त्यांनी स्वागत केले. मंगळवारी (दि. ५) सकाळपासूनच त्यांची भेट घेण्यासाठी आणि त्यांच्या भूमिकेचे समर्थन करण्यासाठी शेकडो कार्यकर्ते त्यांच्या निवासस्थानी पोहोचले होते. त्यावेळी ते बोलत होते.

राष्ट्रवादी काँग्रेसबरोबर काम करताना आमची घुसमट होत होती. आम्हाला अनेक अडचणींना सामोरे जावे लागत होते. निधी वाटपात डावलले जात होते, ही अडचण आम्ही पक्षप्रमुख आणि तत्कालीन मुख्यमंत्री उध्दव ठाकरे यांच्याकडे वारंवार मांडली किंबहुना अशी भूमिका मांडण्यात आम्ही रायगडचे आमदार पुढे होतो. परंतु नेतृत्वाने त्याकडे दुर्लक्ष केले. त्यामुळे नाईलाजाने आम्हाला ही भूमिका घ्यावी लागल्याचे दळवी यांनी या वेळी स्पष्ट केले.

राष्ट्रवादी काँग्रेसच्या विरोधात पहिला उठाव रायगडच्या आमदारांनी केला. पालकमंत्री हटावची मोहीम उघडली, त्यामुळेच हा वणवा राज्यभर पसरला. आमदार भरत गोगावले हेच या असंतोषाचे जनक आहेत. हे लक्षात घेवून आमदार गोगावले यांची पक्षप्रतोद म्हणून नियुक्ती करण्यात आली, असे त्यांनी सांगितले.

बाळासाहेब ठाकरे, आनंद दिघे यांचा हिंदुत्वाचा विचार घेवून आम्ही पुढे निघालो आहोत. २०१९ च्या निवडणूकीत जनतेने जो कौल दिला होता, त्याच्या दिशेनेच आम्ही चाललो आहोत. एकनाथ शिंदे मुख्यमंत्री झाले याचा आनंद निश्चित असला तरी पक्षप्रमुखांच्या बाबतीत जे घडले याचे दुःख आहेच. मात्र ज्यावेळी एखाद्या पक्षातील ४० आमदार उठाव करतात तेव्हा त्यांची भूमिका, भावना लक्षात घेवून जर वेळीच निर्णय घेतला असता तर ही वेळच आली नसती, असे दळवी म्हणाले.

या वेळी राजा केणी, ऋषिकांत डोंगरीकर, जिल्हा परिषदेचे माजी सभापती संजय जांभळे, महेश कोटीयन, अनंत गोंधळी यांच्यासह कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.


### जाहीर प्रसिध्दीकरण

खाली नमुद सहकारी संस्थांचा सन २०२२ ते २०२७ या कालावधीतील पंचवार्षिक निवडणूकीसाठी निवडणूक कार्यक्रम प्रसिध्द करण्यांत येत आहे. संस्थांची नावे- १. राजे मल्हारराव होळकर नागरी सहकारी पतसंस्था मर्या, कळंबोली, ता. पनवेल, जि. रायगड. २. एक्साईड कर्मचारी सहकारी पतसंस्था मर्या, तळोजा, ता. पनवेल, जि.रायगड ३. आय. जी. पेट्रोकेमिकल्स कर्मचारी सहकारी पतसंस्था मर्या, तळोजा, ता. पनवेल, जि.रायगड ४. आस्था महिला नागरी सहकारी पतसंस्था मर्या, खारघर, ता. पनवेल, जि. रायगड ५. कमळगौरी नागरी सहकारी पतसंस्था मर्या, तळोजा, ता. पनवेल, जि. रायगड सदर कार्यक्रमानुसार नामनिर्देशन पत्र स्विकृती दि. ०७/०७/२०२२ ते दि. १३/०७/२०२२, नामनिर्देशन पत्र छानणी दि. १४/०७/२०२२, नामनिर्देशन माघारी दि. १५/०७/२०२२ ते दि. २९/०७/२०२२ व आवश्यकतेनुसार मतदान दि. ०७/०८/२०२२ रोजी घेण्यात येईल. तपशिलवार निवडणूक कार्यक्रम, निवडणुकीबाबत सुचना व अधिक माहिती संस्थेचे कार्यालयात व तालुका सहकारी निवडणूक अधिकारी, पनवेल, पहिला मजला कृषि उत्पन्न बाजार समिती, सहकार नगर, रायगड बाजारच्या बाजुला, पनवेल, जि.रायगड-४१०२०६ यांचे कार्यालयात पहावयास मिळेल. तरी संस्थेच्या सभासदांनी याची नोंद घ्यावी.

सही/-
निवडणूक निर्णय अधिकारी



### गाळा विकणे आहे

विनायक गॅलेक्सी गाळा नं ४,
सेक्टर आर ४, प्लॉट ९७ करंजाडे
मो. ९८२०४४४२५९


## महाडमध्ये वृक्षारोपण; वन विभाग आणि पत्रकारांचा सहभाग

**महाड : प्रतिनिधी**

तालुक्यातील दरडग्रस्त तळीये गावामध्ये महाड पत्रकार संघा तर्फे सोमवारी (दि. ४) वृक्ष रोपांची लागवड करण्यात आली. यावेळी महाडमधील वन विभागाचे अधिकारी, कर्मचारी, ग्रामस्थ व पत्रकार उपस्थित होते.

आजादी का अमृत महोत्सव महोत्सव अंतर्गत रोहा वनविभाग उपवन संरक्षक आणि सहाय्यक वनसंरक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली १ ते ७ जुलै या कालावधीत महाड तालुक्यात वृक्ष लागवड कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. या सात दिवसांमध्ये तालुक्यातील अतिदुर्गम परिसरामध्ये मान्यवरांच्या हस्ते वृक्ष लागवड करण्यात येणार आहे.

या कार्यक्रमाअंतर्गत सोमवारी महाड पत्रकार संघातर्फे वृक्ष रोपांची लागवड करण्यात आली. वनपरिक्षेत्र अधिकारी राकेश साहू यांनी या वेळी वृक्ष लागवडीचे महत्त्व सांगितले. पत्रकार संघाचे उपाध्यक्ष महेश शिंदे, चिटणीस



रोहित पाटील, सदस्य उदय सावंत, रघुनाथ भागवत, चंद्रकांत कोकणे आदींच्या हस्ते या वेळी वृक्ष लागवड करण्यात आली.

## धाटावमध्ये विजेचा खांब ट्रकवर कोसळला

### सुदैवाने जीवितहानी टळली

**धाटाव : प्रतिनिधी**

धाटाव औद्योगिक वसाहतीमध्ये महावितरणचा वीजेचा एक खांब मंगळवारी (दि. ५)ट्रकवर कोसळला. सुदैवाने या घटनेत जीवितहानी झाली नाही.

धाटाव वसाहतील एक्सेल स्टॉप ते डिएमसी या रस्त्यावर केमिकलने भरलेला ट्रक (एनएल-०१,आयएफ-२८७१) उभा होता. या ट्रकवर मंगळवारी विजेचा खांब कोसळला. त्यावेळी झालेला आवाज ऐकून वाहन चालक रमाकांत राम याने ट्रक बाहेर उडी मारून सुरक्षित स्थळी पोहचला. त्यामुळे जीवितहानी टळली. मात्र या घटनेमुळे कामगार व नागरिकांच्या मनात भितीचे वातावरण निर्माण झाले आहे.




### पेण नगरपरिषद, पेण
### जाहीर निविदा प्रसिध्द करणेबाबत

पेण नगरपरिषद, पेण जि. रायगड यांजकडून खालील कामांसाठी अनुभवी व इच्छुक व्यक्ति/संस्था/कंपनी यांजकडून निविदा/दरपत्रक मागविणेत येत आहेत.

| अ.क्र. | कामाचे नांव | नग संख्या | कामाची अंदाजित रक्कम रु. | कामाची फॉर्म फी | इसारा रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| १ | गणपती विसर्जन मार्गावर व विसर्जन ठिकाणी व्यवस्था करणे व विद्युत रोषणाई करणे बाबत. | आवश्यकतेनुसार | २,५०,०००/- | १००/- | १५००/- |
| २ | पथदीप व्यवस्थेकरिता मेनस्वीज व क्लॅम्प पुरविणे. | आवश्यकतेनुसार | २,९५,०००/- | १००/- | १५००/- |

**कामाच्या अटी व शती**

१. निविदा विक्री कालावधी दिनांक.०६/०७/२०२२ ते दिनांक.१८/०७/२०२२ रोजी सायंकाळी ०५.३० वाजेपर्यंत कार्यालयात (सुट्टीचे दिवस वगळता) मिळू शकतील.
२. निविदा जमा करण्याचा कालावधी दिनांक. १९/०७/२०२२ रोजी साय,०५.०० वाजेपर्यंत
३. निविदा उघडण्याचा कालावधी दिनांक.२०/७/२०२२ रोजी स.११.०० वाजता अथवा प्रशासकीय सोयीनुसार
४. या बाबतची अधिक माहिती नगरपरिषदेचे पथदीप विभागात कार्यालयीन वेळेत उपलब्ध होईल.

सही/-
मुख्याधिकारी
पेण नगरपरिषद,पेण



**सिडको** शहरांचे शिल्पकार

### जाहीर सूचना
**(हक्कसोड पत्राबाबत)**

जाहीर सूचनेद्वारे तमाम जनतेस कळविण्यात येते की, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ व अनुषंगिक कामामुळे स्थलांतरीत होणाऱ्या कोंबडभुजे येथील सिडकोच्या जमिनीवरील बांधकाम क्र. KB-२१३ हे श्री. लक्ष्मण तुळशीराम भगत यांचेकडून संपादित झालेली आहे. सदर बांधकाम धारकांना भूखंड क्र. २८८, सेक्टर-२५, क्षेत्र-५६० चौ.मी. चे वाटपपत्र देण्यात आलेले आहे.

| गावाचे नाव/ संचिका क्र. | बांधकाम क्र. | सहबांधकामधारकाचे नाव | बांधकामाचे छपराखालील क्षेत्र (चौ.मी.) | वाटपित भूखंडाचा तपशिल | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | नोड | सेक्टर क्र. | भूखंड क्र. | क्षेत्र (चौ.मी.) |
| कोंबडभुजे | KB-२१६ व KB-२१७ | **श्रीमती मिना जगदीश भगत, श्री. लक्ष्मण तुळशीराम भगत (मयत) वारस श्रीमती जनाबाई लक्ष्मण भगत (मयत) वारस** - १) श्री. मनिष लक्ष्मण भगत २) सौ. वासंती देवराज शेलार ३) सौ. सुगंधा प्रकाश कोळी ४) सौ. हेमलता कमलाकर तांडेल | ७९.९२ | पुष्पक वहाळ | २५ | २८८ | ५६० |

श्री. लक्ष्मण तुळशीराम भगत वारस श्रीमती जनाबाई लक्ष्मण भगत हे दोघे मयत आहेत व त्यांचे वारसांपैकी १) सौ. वासंती देवराज शेलार २) सौ. सुगंधा प्रकाश कोळी ३) सौ. हेमलता कमलाकर तांडेल यांनी श्री. मनिष लक्ष्मण भगत यांना इरादित भूखंड क्र. २८८, सेक्टर-२५, क्षेत्र-५६० चौ.मी. हिस्स्याचे हक्कसोड पत्र सह दुय्यम निबंधक वर्ग-२ (पनवेल-५) येथील मे पवल-५-७४७८-२०२२, पावती क्र. ८०७१ दिनांक ०४.०५.२०२२ हे सादर केले आहे.

उपरोक्त हक्कसोडपत्राप्रमाणे भूखंड क्र. २८८, सेक्टर-२५, क्षेत्र-५६० चौ.मी. यामधील श्री. लक्ष्मण तुळशीराम भगत वारस श्रीमती जनाबाई लक्ष्मण भगत यांचे वारसांनी त्यांचा हिस्सा श्री. मनिष लक्ष्मण भगत यांस देण्यास संमती दिली आहेत व तसेच सह दुय्यम निबंधक श्री. मनिष लक्ष्मण भगत यांच्या लाभात पवल-५-७४७८ दिनांक ०४.०५.२०२२ अन्वये हक्कसोड बाबत आदेश पारित केलेले आहे.

उपरोक्त हक्कसोडपत्र विचारात घेऊन ज्यांनी वाटपित भूखंडामधील हक्क व हितसंबंध सोडून दिलेले आहेत. त्यांची नावे वगळून ज्यांना जे हक्क प्रदान करण्यात आलेले आहेत. अशा व्यक्तीच्या नावे सिडकोकडून भूखंडाचे करारनामा करुन भूखंडाचा ताबा आजच्या तारखेपासून ३० दिवसांत कोणत्याही दिवशी देण्याचे प्रस्तावित आहे.

वरील वाटपित केलेल्या भूखंडा संदर्भात वर नमुद केलेल्या म्हणजेच ज्यांचे लाभात हक्क व अधिकार प्रदान करण्यात आलेले आहेत त्या भूधारकांना सदर योजनेनुसार या पुढे लाभ देणेची पुढील कायदेशीर प्रक्रिया करण्यासंदर्भात जर कोणाची हरकत/तक्रार असेल तर त्यांनी सदर हरकत/तक्रारीच्या समर्थनार्थ सक्षम न्यायालयाचे आवश्यक ते आदेश प्राप्त करून सदर आदेशाच्या साक्षांकित प्रतींसह **अति. मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (विमानतळ) तळ मजला, सिडको भवन, सी. बी. डी. बेलापूर, नवी मुंबई** यांचे कार्यालयात या सूचनेच्या तारखेपासून ३० दिवसांच्या आत सर्व पुरावे व योग्यत्या कागदपत्रांसह दाखल करावेत. वर नमुद केल्याप्रमाणे वाजवी पुरावा असणारी कोणतीही हरकत/तक्रार सदर मुदतीत प्राप्त न झाल्यास सदर योजने अंतर्गत सिडकोद्वारे करण्यात येणाऱ्या पुढील कायदेशीर कार्यवाहीबद्दल कोणाचीही हरकत नाही असे समजुन वरील वाटपित भूखंडाबाबत सिडकोतर्फे पुढील कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

**अति. मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (नमुंआंवि)**

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
www.cidco.maharashtra.gov.in
सिडको/जनसंपर्क/१४१/२०२२-२३

# जुन्या इमारतींकडे विशेष लक्ष

## नवी मुंबई महापालिका करणार स्ट्रक्चरल ऑडिट

**नवी मुंबई : बातमीदार**

नेरूळ सेक्टर १७ येथील जिमी पार्क इमारतीच्या ए विंगमधील दुर्घटनेच्या अनुषंगाने तसेच पावसाळी कालावधीत खबरदारी घेत भविष्यात अशा दुर्घटना टाळण्यासाठी नवी मुंबई महानगरपालिकेने कार्यवाहीस सुरूवात केली आहे. महापालिका आयुक्त अभिजित बांगर यांनी याविषयी संबंधित अधिकाऱ्यांची विशेष बैठक घेत शहरातील ३० वर्ष जुन्या इमारतींची सूची तत्परतेने तयार करून त्यांची संरचना तपासणी अर्थात स्ट्रक्चरल ऑडिट करणेबाबत तातडीने कार्यवाही करावी, असे निर्देश दिले आहेत.

वाशी नोडपासून सिडकोने नवी मुंबई शहर विकसित करण्यास सुरूवात केली. शहरातील अनेक इमारतींचे बांधकाम होऊन ३० वर्षांहून अधिक कालावधी झालेला आहे. त्यामुळे अशा जुन्या इमारतींचे स्ट्रक्चरल ऑडिट करून घेणेबाबत नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने सातत्याने आवाहन करण्यात येत असते. तथापि सोसायट्या तसेच तेथील रहिवाशांकडून या अत्यंत महत्वाच्या विषयाबाबत तितकासा उत्साह व प्रतिसाद दिसून येत नाही, मात्र हे दुर्लक्ष नागरिकांच्या जीविताच्या व मालमत्तेच्या सुरक्षेच्या दृष्टीने अत्यंत घातक आहे. एखाद्या इमारतीबाबत अशी दुर्घटना घडल्यानंतर नागरिकांना याबाबतचे गांभीर्य लक्षात येते. तरीही अशा जुन्या इमारतींत राहणारे नागरिक आपल्या इमारतीचे स्ट्रक्चरल ऑडिट करून घेण्याबाबत तत्परता दाखविताना दिसत नाहीत. त्यामुळे पुढील संभाव्य संकट टाळण्यासाठी अशा जुन्या इमारतींचे स्ट्रक्चरल ऑडिट करणेविषयी महापालिकेने पुढाकार घेतला आहे.

यादृष्टीने महानगरपालिकेच्या नगररचना विभागाने अशा प्रकारच्या ३० वर्षांहून अधिक जुन्या इमारतींची यादी तयार करावी. सिडकोमार्फत शहराचा विकास झाल्याने त्यांच्याकडूनही तशा इमारतींची माहिती घ्यावी व या सूचीच्या अनुषंगाने ३० वर्षे जुन्या इमारतींचे स्ट्रक्चरल ऑडिट बाबतची कार्यावाही संबंधित सोसायट्यांकडून करून घेण्याची प्रक्रिया जलद सुरू करावी असे आदेश आयुक्त अभिजित बांगर यांनी या बैठकीत दिले.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम २६५ अ अन्वये अशा जुन्या इमारतींनी स्ट्रक्चरल ऑडिट करून घेणेबाबत त्यांस विभाग कार्यालय स्तरावरून नोटिसा देण्याची कार्यवाही करण्याचे आयुक्तांमार्फत निर्देशित करण्यात आले असून सदर इमारतींनी त्यांचे बांधकाम सुस्थिती प्रमाणपत्र महानगरपालिकेची नोटीस मिळाल्यापासून ३० दिवसांच्या आत सादर करणे आवश्यक आहे.

स्ट्रक्चरल ऑडिट योग्य रितीने होण्यामध्ये इमारतींना अड़चण येऊ नये याकरिता स्ट्रक्चरल इंजिनियर यांची यादी नवी मुंबई महानगरपालिकेच्या www.nmmc.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. स्ट्रक्चरल इंजिनियर यांनी सूचित केलेल्या दोषनिवारक दुरुस्त्या करून त्याबाबतची माहिती संबंधित विभाग कार्यालयास लेखी कळविण्यात यावी असेही इमारतींना सूचित करावे असे निर्देशित करण्यात आले आहे.

एखाद्या इमारतीने सदर नोटीशीकडे दुर्लक्ष करून स्ट्रक्चरल ऑडिट न केल्यास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ३९८ अ नुसार २५ हजार रुपये किंवा संबंधित इमारतीच्या मालमत्ता कराएवढी रक्कम यापैकी जी अधिक असेल इतक्या रक्कमेच्या दंडाची कारवाई करण्यात येईल असेही नोटीशीत नमूद आहे.

या अनुषंगाने प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याच्या दृष्टीने अतिधोकादायक इमारतींच्या ठिकाणी फलक लावणे, त्याठिकाणच्या नागरिकांना निवासाची पर्यायी व्यवस्था करण्याचे सूचित करणे, सदर इमारत नागरिक निष्कासित करीत नसल्यास दुर्दैवाने दुर्घटना घडल्यास संभाव्य हानी टाळण्याकरिता इमारतीचा विद्युत व पाणी पुरवठा खंडीत करणे अशा प्रकारची कार्यवाही करणेबाबत सूचना देण्यात आल्या.


(संग्रहित छायाचित्र)

### सी-१ कॅटेगरीतील इमारती अतिधोकादायक

सी १ कॅटेगरीमधील इमारती या अतिधोकादायक, राहण्यास अयोग्य व तात्काळ निष्कासित करणे गरजेचे असल्याचे जाहीर करण्यात येते व तशा प्रकारची नोटीसही बजाविण्यात येते. सी १ कॅटेगरीमध्ये यावर्षी ६१ इमारती अतिधोकादायक म्हणून जाहीर करण्यात आलेल्या असून बेलापूर विभागात ७, नेरूळ विभागात ६, वाशी विभागात २०, तुर्भे विभागात १५, कोपरखैरणे विभागात ७, घणसोली विभागात १, ऐरोली विभागात ४ व दिघा विभागात १ इमारत सी-१ कॅटेगरीतील अतिधोकादायक म्हणून जाहीर करण्यात आलेली आहे.

> नागरिकांनी आपल्या इमारतीच्या बांधकामाची स्थिती लक्षात घेऊन इमारतीच्या बांधकामास ३० वर्षांपेक्षा अधिक काळ झाला असेल तर स्ट्रक्चरल ऑडिट करून घेणे अत्यंत गरजेचे आहे. याबाबत कोणत्याही प्रकारचा निष्काळजीपणा हानीकारक ठरू शकतो हे लक्षात घेत नागरिकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने शहरातील ३० वर्षांपेक्षा जुन्या इमारतींची माहिती सिडकोचे सहकार्य घेऊन तत्परतेने संकलित करण्याचे काम नरररचना विभागामार्फत करण्यात येत असून या इमारतींचे स्ट्रक्चरल ऑडिट करून घेण्याबाबत महानगरपालिकेने पुढाकार घेतला आहे. तरी अशा इमारतीत राहणा-या नागरिकांनी स्वयंस्फूर्तीने स्ट्रक्चरल ऑडिट करून घ्यावे.
>
> -अभिजित बांगर, आयुक्त, नवी मुंबई महानगरपालिका



# युवकांचा भाजपमध्ये प्रवेश

**नवी मुंबई : बातमीदार**

नेरूळ येथील अनेक युवकांनी भाजपमध्ये जाहीर प्रवेश केला आहे. पंडित दीनदयाळ उपाध्याय भवनात हा पक्षप्रवेश कार्यक्रम झाला.

या वेळी उत्तर भारतीय मोर्चाचे ज्येष्ठ प्रदेश सरचिटणीस प्रद्युम्न शुक्ला, युवा प्रदेश संयोजक विक्रम खुराना, प्रदेश प्रवक्ते विनोद उपाध्याय, प्रदेश कार्यकारिणी सदस्य सुरेश पाल, जिल्हा सरचिटणीस सुभाष विश्वकर्मा, उपाध्यक्ष विनोद शहा, उपाध्यक्ष अध्यक्ष विजय सिंह आणि उत्तर प्रदेश सेलचे संयोजक मार्कंडेय केवट आदी उपस्थित होते.

ऐरोलीचे सामाजिक कार्यकर्ते राजेश शुक्ला आणि अमित पांडे यांचे विशेष योगदान होते. प्रदेश सरचिटणीस प्रद्युम्न शुक्ल यांनी सर्वांना मार्गदर्शन केले व युवकांच्या सहभागाने आगामी काळात उत्तर भारतीय आघाडी अधिक ताकदवान होईल अशी अपेक्षा व्यक्त केली. आगामी काळात उत्तर भारतीय समाजातील लोक मोठ्या संख्येने भाजपमध्ये दाखल होणार असून नवी मुंबई महापालिका निवडणुकीत कमळ फुलणार असल्याची ग्वाही उत्तर भारतीय मोर्चा नवी मुंबई जिल्हाध्यक्ष राजेश राय यांनी वरिष्ठांना दिली.

# बकरी ईदनिमित्त पनवेलमध्ये रक्तदान शिबिर

**पनवेल : प्रतिनिधी**

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मुलन समिती, सर्वोदय, हुसेनी फाऊंडेशन व इतर सहयोगी संस्थांच्या संयुक्त विद्यमाने आणि रोटरी ब्लड बँक यांच्या सहकार्याने पनवेलमध्ये शनिवारी (दि. ९) बकरी ईदनिमित्त खांदा कॉलनीत रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले आहे.

आजच्या सामाजिक परिस्थितीचा विचार करता, सर्व धर्मियांनी धार्मिक सण हे अधिकाधिक कालसुसंगत व मानवतावादी करणे हे धर्माचेच उन्नयन आहे. हाच विचार समोर ठेवून बकरी ईदनिमित्त पशूची कुर्बानी देण्याच्या प्रथेमध्ये कालानुरूप बदल व्हावा व या प्रथेला पर्याय म्हणून त्या दिवशी सर्वात श्रेष्ठ, असे रक्तदान करण्याचे आवाहन सर्व



समविचारी संस्थांकडून केले जात आहे. खांदा कॅालनी येथील सेक्टर १ मधील रोटरी ब्लड बँकमध्ये हे रक्तदान शिबिर सकाळी ९.३० दुपारी ३ या वेळेत ठेवण्यात आलेले आहे

महाराष्ट्र अंधश्रध्दा निर्मूलन समिती शाखा पनवेल, सर्वोदय, हुसेनी फाऊंडेशन, राष्ट्र सेवा दल, ग्रामस्वराज्य समिती महाराष्ट्र, ग्राममित्र, ग्रामसंवर्धन सामाजिक संस्था, कुष्ठरोग निवारण समिती शांतीवन, युसुफ पेहेरअली सेंटर, तारा, मिशन माणुसकी, भ्रष्टाचार विरोधी जन आंदोलन व इतर संस्थांकडून मुस्लीम बांधवांसमवेत आपण ही ईद सगळे धर्म-जाती पलीकडे, मानवतेसाठी साजरी करू या, असे आवाहन करण्यात आले आहे.

अधिक माहितीसाठी नासीर शेख (७०२१७०७८२७), अल्लाउद्दीन शेख (८०८०४५४५५५), सिद्धेश (९८७०९११९११), नाजुका (८९७६८७१३८१) या क्रमांकांवर संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# 'एसबीआय'तर्फे ग्रंथ भेट व वृक्षारोपण

**नवी मुंबई : बातमीदार**

स्टेट बँक ऑफ इंडिया (एसबीआय) च्या ६७व्या वर्धापन दिनाचे औचित्य साधून नवी मुंबई महानगरपालिका मुख्यालयातील बँकेच्या शाखेमार्फत नवी मुंबई महापालिकेच्या ऐरोली येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक ग्रंथालयास २०० पुस्तकांची ग्रंथभेट देण्यात आली.

या वेळी नवी मुंबई महापालिकेचे समाज विकास विभाग उपायुक्त दादासाहेब चाबुकस्वार, स्मारकाच्या सुविधा नियंत्रक संध्या अंबादे यांचेकडे बँकेचे क्षेत्रीय व्यवस्थापक कपील गर्ग आणि नमुंमपा मुख्यालय शाखा व्यवस्थापक शामली आरस आणि इतर अधिकारी उपस्थित होते.

नवी मुंबई महानगरपालिकेचे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक हे देशातील सर्वोत्तम स्मारक म्हणून नावाजले जात असून येथील ग्रंथालय ई-लायब्ररी सुविधेसह अद्ययावत आहे. या पुस्तक भेटीमुळे ग्रंथालयाच्या समृध्दीत भर पडणार आहे.त्याचप्रमाणे बँकेच्या वतीने सेक्टर २१ नेरूळ येथील रॉक गार्ड़न मध्ये २४० देशी प्रजातींची झाडे लावून वृक्षारोपण करण्यात आले.




या वेळी नवी मुंबई महापालिकेचे उद्यान उपायुक्त नितीन नार्वेकर, उद्यान अधिक्षक भालचंद्र गवळी, बँकेचे क्षेत्रीय व्यवस्थापक कपील गर्ग व नमुंमपा मुख्यालय शाखा व्यवस्थापक शामली आरस उपस्थित होते. त्यांच्या हस्ते बकुळ, अनंत, कडुनिंब, करंज, बहावा अशी जैवविविधतेला पूरक देशी वृक्षरोपे लावण्यात आली.

बँकेच्या वर्धापन दिनाचे औचित्य साधून सामाजिक बांधिलकी जपत ग्रंथभेट व वृक्षारोपण यासारखे उपयोगी उपक्रम राबविल्याबद्दल महापालिकेच्या वतीने स्टेट बँक ऑफ इंडिया प्रशासनाला वर्धापन दिनाच्या शुभेच्छा देत अभिनंदन करण्यात आले.

# पनवेलच्या पटवर्धन रुग्णालयात अवघड शस्त्रक्रिया यशस्वी

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल येथील रा. स्व. संघ जनकल्याण समिती संचालित डॉ. प्रभाकर पटवर्धन स्मृती रूग्णालयात अवघड शस्त्रक्रिया यशस्वी झाली आहे.

रा. स्व. संघ जनकल्याण समिती संचालित डॉ. प्रभाकर पटवर्धन स्मृती रूग्णालय हे परिसरातील अनेक गरजू लोकांसाठी सेवाभावी वृत्तीने कार्यरत आहे. नुकताच घडलेला हा प्रसंग, अरुण कांबळे नावाच्या रुग्णाला डॉ. गिरिश गुणे यांनी पटवर्धन रुग्णालयात पाठवले. रुग्ण जवळ जवळ बेशुद्ध अवस्थेत होता. रुग्णालयातील निवासी डॉक्टरांनी रुग्णाची प्राथमिक तपासणी करून आयसीयू मध्ये रुग्णास दाखल केले. डॉ. विरती शहा (निरोफिजीशियन) यांनी रुग्णाची तपासणी केली. रुग्णाला चार दिवसांपूर्वी उलट्या होत होत्या. नंतर रुग्णाने माणसे ओळखणे बंद केले व नंतर हालचाल करणेच थांबले. यामुळे सर्व तपासण्या करून रुग्णाचा सीटी स्कॅन केला व मेंदूचे ऑपरेशन करणे आवश्यक असल्याचे सांगण्यात आले व तसे डॉ. दिप्पाल जाधव (निरोसर्जन) यांना रुग्णालयात बोलवण्यात आले. त्यांनी रुग्णाच्या नातेवाइकांना मेंदूच्या शस्त्रक्रियेबाबत माहीत दिली व नातेवाइकांनी लगेचच मान्यता दिल्यामुळे ताबडतोब ऑपरेशन करण्याचा निर्णय केला.



आजपर्यंत अशा रुग्णाला ऑपरेशनसाठी दुसऱ्या रुग्णालयात पाठवत येत असे, पण रुग्णालयात असलेले अद्यायावत थिएटर बघून डॉ. जाधवांनी ही शस्त्रक्रिया पटवर्धन रुग्णालयातच करण्याचा निर्णय घेतला. ही सुरुवात कधीतरी होणे गरजेचे होते. शस्त्रक्रिया यशस्वी झाली. दोनच दिवसांत रुग्णाला सामान्य कक्षात हलवण्यात आले व रुग्ण बरा होवून घरी गेला. रुग्णाच्या नातेवाईकांच्या चेहऱ्यावर आनंद जाणवत होते व त्यांनी रुग्णालयातील सर्व डॉक्टर, कर्मचारी यांचे आभार मानले.

# नेरूळ आरटीओ टेस्टिंग ट्रॅक कार्यालयात सोलर सिस्टीम

**नवी मुंबई : बातमीदार**

उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या नेरूळ सेक्टर १९ येथील वाहन तपासणी केंद्र व सेक्टर १३ येथील अंतिम टप्प्यात असेलेल्या प्रादेशिक केंद्रावर सोलर सिस्टीम बसवण्यात येणार आहे.

सध्या सुरु असलेल्या टेस्टिंग ट्रॅकच्या ठिकाणी निरीक्षकांच्या बसण्याच्या जागी लाईट व पंख्याची व्यवस्था नसल्याने अधिकाऱ्यांना त्याच स्थितीत काम करावे लागत होते. या विषयी आम आदमी पक्षाच्या स्थानिक पदाधिकारी छाया खेमाणी यांनी उप प्रादेशिक परिवहन अधिकारी हेमांगिनी पाटील यांच्याकडे याबाबत सुविधा उपलब्ध करून देण्याची मागणी केली होती. त्यास यश आले आहे.

उपप्रादेशिक अधिकारी हेमांगिनी पाटील यांनी तातडीने पिंक लोटस या समाजिक संस्थेला सीएसआर फंडातून या केंद्रावर सोलर सिस्टीम उभारून द्यावी, अशी मागणी केली आहे. या केंद्रात विजेचे कनेक्शन घेण्यासाठीची व्यवस्था नसल्याने सोलर सिस्टीम उपक्रम पडणार आहे. सोलरचा वापर करत पंखे व लाईटची सुविधा मिळणार आहे.

# विद्यार्थ्यांना शालेय साहित्यासह खाऊचे वाटप

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

रसायनी पाताळगंगा अतिरीक्त एमआयडीसी परिसरातील चावणे येथील स्थानिक प्रकल्पग्रस्त शेतकरी संस्थेच्यावतीने परिसरातील प्राथमिक शाळांतील विद्यार्थ्यांना शालोपयोगी साहित्याचे वाटप करण्यात आले.

प्राथमिक शाळा चावणे व प्राथमिक शाळा कालिवली या शाळेतील विद्यार्थ्यांना शिक्षणात अडचण येवू नये. यासाठी स्थानिक प्रकल्पग्रस्त शेतकरी संस्था (रजि.)चे अध्यक्ष मारुती पाटील, उपाध्यक्ष कृष्णा पाटील, सरचिटणीस प्रकाश सोनावळे, सचिव मधुकर सोनावळे, खजिनदार भरत पाटील यांनी अडचण लक्षात घेऊन विद्यार्थ्यांना दोनशे पानी वह्या संच,पेनसह इतर शालेय साहित्य व खाऊ वाटप केले.

या वेळी प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर समाधानाचे वातावरण दिसून आले. अरुण पवार, नितीन तेजे, अशोक कचरे, नामदेव पाटील, शालेय शिक्षक पाटील, शालेय शिक्षक चव्हाण उपस्थित होते.



# उत्कर्ष ज्येष्ठ महिला मंडळाचा वर्धापन दिन उत्साहात




**नवी मुंबई : बातमीदार**

उत्कर्ष ज्येष्ठ महिला मंडळ, नेरूळचा दहावा वर्धापन दिन मोठ्या उत्साहात झाला. मंडळाच्या वतीने अनेक सेवाभावी संस्थांना आर्थिक मदत देण्यात आली, तसेच ज्येष्ठ महिलांनी विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले.


या वेळी माजी सभागृह नेते रवींद्र इथापे, सामाजिक कार्यकर्त्या डॉ. अरुंधती भालेराव, ममता सिंधुताई सपकाळ, माजी सभापती नेत्रा शिर्के, उत्कर्ष मंडळाच्या अध्यक्ष रेखा वाळवेकर, उपाध्यक्ष अपर्णा दाबके, पालकर, रजनी कलोसे, करंदीकर, प्रभु, ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष अरविंद वाळवेकर, बॅनर्जी,ब प्रभाकर गुमास्ते, सावंत, दीपक दिघे, पी. आर. गुप्ता आदी उपस्थित होते.

मदर तेरेसा उद्द्यानातील विरंगुळा केंद्राचा करारनामा सभागृह नेते रवींद्र इथापे यांनी उत्कर्ष महिला मंडळास सुपूर्द केला व लवकरच ते विरंगुळा केंद्र सुरू करावे, असे सांगितले.

# माणगावात मुसळधार पाऊस

## काळ नदी तुडूंब भरली; सतर्कतेचे आवाहन



(छाया : सलीम शेख)

**माणगाव : प्रतिनिधी**

तालुक्यात गेल्या दोन दिवसांपासून मुसळधार पाऊस कोसळत आहे. त्यामुळे जनजीवन पूर्णपणे विस्कळीत झाले आहे.

माणगाव शहरासह तालुक्यात सोमवारी सकाळपासूनच पावसाने दमदार सुरूवात केली होती. मंगळवारी (दि. ५) ढगफुटीसारखा पाऊस कोसळत होता. या पावसाने जनजीवन विस्कळीत झाले असून, वातावरणात गारवा निर्माण झाला आहे. शेतकरी राजा सुखावला असून लावणीच्या कामांना वेग आला आहे. बहुतांशी दुकाने सुरु असल्याने नागरिक खरेदीसाठी दुकानात येत होते.

माणगावात दरवर्षी एक दोन दिवस मुसळधार पाऊस पडल्यास कचेरीरोड तसेच मोर्बारोड परिसरात पाणीच पाणी होत असे, मात्र या वर्षी नगरपंचायतीने चांगल्या प्रकारे गटार सफाई केल्याने यावर्षी माणगावकरांचा पाण्यापासून बचाव झाला आहे. माणगावमधील काळ नदी तुडूंब भरली असून कधीही ती धोक्याची पातळी ओलांडण्याची शक्यता आहे. त्यामुळे नागरिकांनी सतर्कता बाळगण्याचे आवाहन माणगावच्या उपविभागीय अधिकारी प्रशाली जाधव-दिघावकर यांनी केले आहे.

# माणगाव-मोर्बा रस्त्यावरील मातीचे ढिगारे देताहेत अपघाताला निमंत्रण

## नगरपंचायतीने लक्ष देण्याची भाजपच्या शर्मिला सत्वे यांची मागणी



**माणगाव : प्रतिनिधी**

तालुक्यातील खांदाड गावच्या हद्दीत पेट्रोल पंपाजवळ गटार काढण्याचे काम करीत असताना निघालेल्या मातीचे ढिगारे माणगाव-मोर्बा रस्त्यावर टाकण्यात आले आहेत. पावसाच्या पाण्याने ही माती रस्त्यावर येऊन अपघाताला निमंत्रण देत आहे. गेल्या तीन दिवसांत याठिकाणी दोन ते तीन अपघात झाले आहेत. माणगाव नगरपंचायतीने हे मातीचे ढिगारे त्वरित उचलावेत, अशी मागणी कोकण विभागीय भाजप किसान मोर्चाच्या महिला अध्यक्षा शर्मिला सत्वे यांनी केली आहे.

दिघी-पुणे राज्य महामार्गामुळे माणगाव-मोर्बा हा रस्ता नेहमीच गजबजलेला असतो. शिवाय या मार्गावरून श्रीवर्धन, हरिहरेश्वर, दिवेआगर याठिकाणी पर्यटक जात असतात. तसेच या रस्त्यावर सतत रिक्षा व दुचाकी धावत असतात. पावसाचे पाणी वाहून जाण्यासाठी या रस्त्याशेजारील गटाराचे काम करीत असताना निघालेल्या मातीचे ढिगारे माणगाव नगरपंचायतीने या रस्त्यावर करून ठेवले आहेत. ही माती पावसाच्या पाण्याबरोबर वाहत येऊन रस्ता चिखलमय होत आहे. त्यामुळे दुचाकी वाहनांचे अपघात होत आहेत. याकडे माणगाव नगरपंचायतीने लक्ष देऊन हे मातीची ढिगारे लवकरात लवकर उचलावेत, असे शर्मिला सत्वे यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे.

# रोह्यात मुसळधार पाऊस; नदी, नाले भरून वाहू लागले





(छाया : महादेव सरसंबे)

**रोहे : प्रतिनिधी**

तालुक्यात गेले दोन दिवस मुसळधार पावसाने धुमाकूळ घातला आहे. त्यामुळे रोहा तालुक्यातील नदी, नाले भरुन वाहू लागले आहेत. कुंडलिका नदीही दुथडी भरून वाहू लागली आहे. शेतीसाठी पुरक पाऊस झाल्यामुळे बळीराजा मात्र सुखावला आहे.

रोहा शहरासह तालुक्यातील ग्रामीण सोमवारपासून पावसाने जोरदार सुरुवात केली आहे. सोमवारी रात्री तालुक्यात जोरदार पाऊस झाला. सोमवारी संपुर्ण दिवस पाऊसमय झाल्याचे दिसून आले. वातावरणही ढगाळ होते. मंगळवारी सकाळपासून मुसळधार पाऊस पडत आहे. त्यामुळे रोहा तालुक्यातील नाले भरून वाहू लागले आहेत. कुंडलिका नदी पात्र दुथडी भरुन वाहत आहे. गंगा नदीही भरून वाहू लागली आहे.

रोहा तालुक्यातील मेढा, यशवंतखार, चणेरा, घोसाळे, धाटाव, देवकान्हे, धामणसई, सुतारवाडी, कोलाड, खांब विभागातही मुसळधार पाऊस पडत आहे. त्यामुळे छोटे-मोठे नदी नाले भरुन वाहू लागले आहेत.

मुसळधार पाऊस पडत असल्याने रोहा बाजारपेठेत तुरळक गर्दी दिसून आली. विद्यार्थी रेनकोट व छत्र्या घेऊन शाळेत जाताना दिसले. तर सकाळी पावसाने कामगारांनाही भिजवल्याचे दिसून आले.

# कोकण रेल्वेच्या ट्रॅकमनला मारहाण; गुन्हा दाखल

**माणगाव : प्रतिनिधी**

कोकण रेल्वेमार्गावरील माणगाव तालुक्यातील विंचवली गावच्या हद्दीत सोमवारी (दि. ४) दुपारच्या सुमारास अज्ञात इसमाने ट्रॅकमनला मारहाण केल्याची घटना धडली. या प्रकरणी माणगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

राजकुमार शंकर मोरे (वय ५२, रा. नाणोरे, ता. माणगाव) हे कोकण रेल्वे मार्गावर ट्रॅकमॅन म्हणून काम करतात. ते सोमवारी विंचवली गावच्या हद्दीत रेल्वे रुळावर चावी मारण्याचे काम करीत असताना दुपारी १ वाजण्याच्या दरम्यान कोणीतरी अज्ञात इसमाने त्यांच्या डोक्यात लाकडी दांडका मारला. त्यामुळे राजकुमार मोरे जखमी झाले.

या प्रकरणी अज्ञात इसमावर गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास सहाय्यक निरीक्षक श्री. मोहिते करीत आहेत.

# तळा उसर खुर्द येथील शाळेत चोरी

**माणगाव : प्रतिनिधी**

तळा तालुक्यातील उसर खुर्द येथील अभिनव ज्ञानमंदिर शाळेतील इयत्ता नववीच्या वर्गातून एक लाख १५ हजार रुपयांचा ऐवज चोरून अज्ञात चोरटा फरार झाला आहे.

उसर खुर्द गावातील अभिनव ज्ञानमंदिर शाळेच्या नववीच्या वर्गाच्या दरवाजाचे कुलूप आणि बॅटरी रुमचा कडीकोयंडा तोडून अज्ञात चोरट्याने २ ते ४ जुलै या कालावधीत सोलर पॅनलमधील चार सोलर प्लेट, एक हायर कंपनीची ४३ इंची स्मार्ट टीव्ही, लूमिनस कंपनीचे चार सोलर प्लेट असा एकूण एक लाख १५ हजार रुपयांचा ऐवज चोरून नेला आहे.

या प्रकरणी अंजली विजय धारसे (वय ५७) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून तळा पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्यावर गुन्हा दाखल करण्यात आला असून, अधिक तपास उपनिरीक्षक श्री. खराडे करीत आहेत.

# माणगाव येथे कृषी दिन उत्साहात

**माणगाव : प्रतिनिधी**

माजी मुख्यमंत्री कै. वसंतराव नाईक यांच्या जयंती निमित्ताने माणगाव पंचायत समिती कार्यालयात कृषी दिन करण्यात आला. शेतकऱ्यांनी आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब करून शेती करावी, असे आवाहन गट विकास अधिकारी वाय. एम. प्रभे यांनी या वेळी केले.



कृषी अधिकारी बी. व्ही. काप यांनी प्रास्ताविकात कृषी दिनाचे महत्त्व व कृषी विभागाच्या विविध योजनांबद्दल माहिती दिली. कृषी संजीवनी मोहिमेअंतर्गत माणगाव तालुक्यांतील ११० गावांमध्ये व १६६७ शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन मार्गदर्शन करण्यात आले. तसेच भात लागवड तंत्रज्ञान, खत बचत, महिला शेतकरी सबलीकरण, प्रगतशील शेतकरी संवाद, कृषिपूरक व्यवसाय इत्यादी उपक्रम राबविण्यात आल्याचे तालुका कृषी अधिकारी आर. डी. पवार यांनी सांगितले.

सन २०२१-२२ या वर्षातील भातपीक स्पर्धेतील विजेते बापू बक्कम कोशिंबळे, सोमनाथ पास्टे, श्रीकांत हाटे तसेच नाचणी पिकाचे विक्रमी उत्पादन घेणारे राजू तेलंगे या शेतकऱ्यांना या वेळी प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. नवतरुण शेतकरी गट (दहीवली) या गटाला नोंदणी प्रमाणपत्र देण्यात आले. तालुक्यातील महिला शेतकरी गटांना परसबागेतील भाजीपाला लागवड करण्यासाठी भाजीपाला बियाणे किट वाटप करण्यात आले.

गटविकास अधिकारी वाय. एम. प्रभे यांच्या हस्ते पंचायत समितीच्या आवारात वृक्षलागवड करुन कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. यावेळी विस्तार अधिकारी अशोक मार्कड, तंत्रज्ञान व्यवस्थापक प्रमोद शिंदे, मंडळ कृषी अधिकारी किरण पडळकर यांच्यासह कृषी विभागाचे कर्मचारी आणि शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# प्लास्टिक बंदीचे ग्रामीण भागातही काटेकोर पालन करावे

## जि. प. मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. किरण पाटील यांच्या सूचना

**अलिबाग : प्रतिनिधी**

ज्या प्लास्टिकच्या वस्तूंचा एकदाच वापर होणार असून, नंतर त्या निरुपयोगी ठरणार आहेत अशा सिंगल युज प्लास्टिक वस्तू वापरावर भारत सरकारच्या पर्यावरण, वन व वातावरणीय बदल मंत्रालयाने बंदी आणली आहे. प्लास्टिक उत्पादक, साठेदार, पुरवठादार, विक्रेते यांनी अधिसूचनेचे उल्लंघन केल्यास दंडात्मक कारवाई होणार आहे, या निर्णयाची जिल्ह्यातील ग्रामीण भागात काटेकोर अंमलबजावणी करण्याच्या सूचना, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. किरण पाटील यांनी दिल्या आहेत.

सिंगल युज प्लास्टिकचे रिसायकलिंग होत नाही व त्याचे सहजासहजी विघटनही होत नाही तसेच ज्या प्लास्टिकच्या वस्तूंचा एकदाच वापर होणार असून नंतर त्या निरुपयोगी ठरणार आहेत, अशा सिंगल युज प्लास्टिक वस्तू वापरावर भारत सरकारच्या पर्यावरण, वन व वातावरणीय बदल मंत्रालयाने बंदी आणली आहे.



प्लास्टिकमुळे सागरी जीव, वन्यजीव व मानवी आरोग्यावर विपरीत परिणाम होतात, अविघटनशील कचरा जाळल्याने श्वसनाचे आजार व पर्यावरणावर विपरित परिणाम होतो. प्लास्टिक खाल्ल्याने सजीव प्राणी मृत्युमुखी पडतात. या अनुषंगाने प्लास्टिक कचरा हाताळताना विविध समस्या निर्माण होतात व त्याच्या विल्हेवाटीचा आर्थिक भार ग्रामपंचायतींना सहन करावा लागतो, यावर पर्याय म्हणून आता १०० मायक्रॉनपेक्षा कमी जाडीच्या प्लास्टिक पिशव्या व सिंगल युज प्लास्टिक वापरण्यावर केंद्रीय पर्यावरण मंत्रालयाने बंदी आणली आहे. या बंदीची काटेकोर अंमलबजावणी करण्याच्या सूचना जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. किरण पाटील यांनी दिल्या आहेत.

प्लास्टिक बंदी असणारे घटक

प्लास्टिक कॅरीबॅग, पॉलिथिन (७५ मायक्रॉनपेक्षा कमी जाडी), प्लास्टिकच्या ईयर बड्स, फुग्यासाठी प्लास्टिकच्या काठ्या, प्लास्टिकचे ध्वज, मिठाईच्या प्लास्टिकच्या काड्या, आइस्क्रीमसाठी प्लास्टिकच्या काड्या, थर्माकोलच्या सजावटीच्या वस्तूंचा समावेश आहे. तसेच प्लॅस्टिक प्लेट्स, कप, ग्लास, काटे, चमचे, स्ट्रॉ, ट्रे, फॉइल पॅकेजिंग बॉक्स, निमंत्रण पत्रांसाठी फॉइल, सिगारेट पॅकिंग करण्यासाठी वापरलेले फॉइल, १०० मायक्रॉनपेक्षा पातळ पीव्हीसी आणि प्लास्टिक बॅनर इत्यादींचा समावेश आहे.


### ग्रामपंचायतीने करावयाची कामे

**सिंगल युज प्लास्टिक बंदी यशस्वी करण्यासाठी ग्रामपंचायतीने प्रबोधन करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. लोकांचे प्रबोधन करण्यासाठी दवंडी द्यावी, पोष्टर व घडीपत्रिकाद्वारे आवाहन करावे, दुकानदारांना नोटीसा बजावणे, व्यापाऱ्यांच्या बैठकांचे आयोजन करून प्लास्टिक बंदीचे आवाहन करावे, व्यापारी वर्गाकडे अस्तित्वातील प्लास्टिक वस्तूंचा साठा हा प्राधिकृत पुनर्चक्रीकरण करणाऱ्या संस्थेस वर्गीकृत करावा व प्लास्टिक कचऱ्याचे योग्य व्यवस्थापन करावे, शास्त्रीय विल्हेवाटीसाठी व्यवस्था निर्माण करून प्लास्टिक बंदी यशस्वी करावयाची आहे.**

# सीसीटीएनएस कार्यप्रणालीत रायगड पोलीस दल ठरले अव्वल

**अलिबाग : प्रतिनिधी**

राज्य सरकारच्या महत्वाकांक्षी सीसीटीएनएस कार्यप्रणालीत रायगड पोलीस दल राज्यात अव्वल ठरले आहे. रायगड पोलीस दलाने २४२ गुणांपैकी २३७ गुण प्राप्त करून ९८ टक्के गुणांसह मे महिन्याच्या गुणांकणात प्रथम क्रमांक पटकावला आहे.




पोलीस ठाण्यात दाखल होणारे गुन्हे, अटक होणारे गुन्हेगार यांच्यावर अंकुश ठेवण्याकरीता विविध उपाय योजना करण्यात येतात. त्यामध्ये तंत्रज्ञानाचाही वापर होतो. सीसीटीएनएस म्हणजेच क्राइम अ‍ॅन्ड क्रिमीनल ट्रॅकींग नेटवर्क सिस्टीम हा पोलीस दलातील महत्वाकांक्षी प्रकल्प असून सर्व संपूर्ण राज्यभरात या प्रणालीचे कामकाज सुरू आहे. या ऑनलाइन कार्यप्रणालीमुळे सर्व पोलीस ठाणी एकत्र जोडली गेली आहेत. पोलीस ठाण्यांतील बहुतांश कागदोपत्री कामकाज बंद झाले असून सर्व नोंदी व प्रक्रिया या ऑनलाइन घेतल्या जातात. पोलीस ठाण्यात अटक होणाऱ्या गुन्हेगारांच्या नोंदी सदरच्या प्रणालीत होत असल्यामुळे, कोणत्याही पोलीस ठाण्यात कुठल्याही गुन्हेगाराचे नाव सदर प्रणालीत टाकल्यानंतर सदर आरोपीवर यापुर्वी किती गुन्हे दाखल आहेत, याची इत्यंभुत माहिती प्राप्त होते. त्यामुळे गुन्हे आणि गुन्हेगारांची कुंडली जुळवण्यात ही प्रणाली अत्यंत प्रभावी ठरत आहे.

मागील काही महिन्यात सीसीटीएनएस कार्यप्रणालीमध्ये रायगड जिल्हा सातत्याने चांगली कामगिरी करीत आला आहे. या प्रणालीचा वापर करून केलेल्या चांगल्या कामगिरीमध्ये गुन्हे उघड करणे, वाहनांची तपासणी, गुन्हेगारांचा पुर्वइतिहास, प्रतिबंधक कारवाई, सिटीझन पोर्टल आदिंचा समावेश आहे. यात उत्तम कामगिरी दाखवत २४२ गुणांपैकी २३७ गुणांची कमाई करीत रायगड जिल्हा पोलीस दलाने राज्यात प्रथम क्रमांक प्राप्त केला आहे.

रायगडचे पोलीस अधीक्षक अशोक दुधे व अपर पोलीस अधीक्षक रायगड अतुल झेंडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस अधीक्षक कार्यालय येथे स्थापीत सीसीटीएनएस कक्ष व पोलीस ठाण्यात नियुक्त प्रशिक्षीत पोलीस अंमलदार यांनी ही प्रशंसनीय कामगिरी केली आहे. मागील काही महिन्यांमध्ये रायगड जिल्हा पोलीस दलाने सीसीटीएनएस प्रणालीमध्ये सातत्याने चांगली कामगिरी केली आहे. पोलीस ठाण्यांकडील कामकाजामध्ये या प्रणालीचा अधिक चांगल्या प्रकारे वापर करून यापुढेही हे सातत्य कायम राखले जाईल, असा विश्वास अपर पोलीस अधिक्षक अतुल झेंडे यांनी व्यक्त केला.

**सीसीटीएनएस पोलीस विभागाचा एक महत्वकांक्षी प्रकल्प आहे. गुन्हयांची ऑनलाइन नोंदणी, अन्वेषण, गुन्हेगारांवरील पुर्व इतिहास, प्रतिबंधक कारवाई, ऑन-लाईन पोर्टलचा उपयोग याव्दारे कमी वेळात अधिकाधिक माहिती उपलब्ध करून अन्वेषणामध्ये त्याचा उपयोग करणे इत्यादी विविध कामकाजामध्ये रायगड जिल्ह्याने सातत्याने चांगली कामगिरी केली आहे. पुढेही सातत्य कायम ठेवत गुन्ह्यांना आळा बसावा व गुन्हेगारांवर वचक निर्माण व्हावा, याकरीता रायगड पोलीस दल प्रयत्नशील राहणार आहे.**

**-अतुल झेंडे, अपर पोलीस अधीक्षक, रायगड.**

# कर्जत जामरुंगमध्ये वृक्षलागवड



(छाया : संतोष पेरणे)



**कर्जत : बातमीदार**

तालुक्यातील टेंबरे आणि जामरुंग येथील वृक्षप्रेमी तरूणांनी आपल्या ग्रामपंचायत हद्दीत वृक्षलागवड चळवळ हाती घेतली आहे. या तरूणांनी नुकताच जामरुंग भागात तब्बल १५० वृक्षांची लागवड केली असून त्या झाडांना कुंपणदेखील करून घेतले आहे.

जामरुंग येथील निलेश मेदगे, निखिल बांगर, विजय बिबवे, आत्माराम पिंपरकर, उमेश घुडे, संपत मोरे, राहुल वरखडे, अशोक कोकणे, निलेश पिंपरकर आणि करण सावंत यांनी ग्रामपंचायत हद्दीतील ओसाड टेकडीवर पेट्राफॉर्म, शिसम, चिंच, करंज, बांबू, पिंपळ, गुलमोहर, आदी प्रकारची झाडांची लागवड केली आहे.

# टीम इंडियाचे स्वप्न भंगले!

## निर्णायक सामन्यात इंग्लंड विजयी; मालिका बरोबरीत



**बर्मिंगहॅम : वृत्तसंस्था**

भारत आणि इंग्लंड यांच्यातील पाच सामन्यांच्या मालिकेतील शेवटचा सामना यजमान संघाने सात गडी राखून जिंकला. पाचव्या दिवशी इंग्लंडला विजयासाठी ११९ धावांची, तर भारताला सात बळींची आवश्यकता होती. भारताने दुसऱ्या डावात सर्वबाद २४५ धावा केल्या होत्या. त्यामुळे भारताकडे ३७७ धावांची आघाडी आली होती, मात्र इंग्लंडच्या फलंदाजांनी चांगली कामगिरी करत विजय मिळवला. पाचवा सामना इंग्लंडने जिंकल्यामुळे मालिका २-२ अशी बरोबरी सुटली आहे.

भारतीय संघाने पहिल्या डावात सर्वबाद ४१६ धावांपर्यंत मजल मारली. त्यानंतर फलंदाजीसाठी उतरलेल्या यजमान इंग्लंडला सर्वबाद २८४ धावांपर्यंत मजल मारता आली. आपल्या पहिल्या डावात इंग्लंडची फलंदाजी सपशेल ढेपाळली होती, पण जॉनी बेअरस्टोच्या शतकी खेळीमुळे त्यांना फॉलोऑन टाळण्यात यश आले. १३२ धावांची आघाडी मिळवूनही भारताला दुसऱ्या डावात साजेशी कामगिरी करता आली नाही. चेतेश्वर पुजारा (६६) व रिषभ पंत ( ५७) यांच्या अर्धशतकांच्या जोरावर भारताने २४५ धावांपर्यंत मजल मारली आणि इंग्लंडसमोर ३७८ धावांचे लक्ष्य ठेवले.

भारताच्या ३७८ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना जॅक क्रॅवली (४६) व ॲलेक्स लीज (५६) यांनी पहिल्या विकेटसाठी १०७ धावा जोडल्या अन् मजबूत पाया रचला. त्यानंतर भारताने २ धावांच्या अंतराने तीन विकेट्स घेत कमबॅक केले, पण जो रूट व जॉनी बेअरस्टो यांनी २०० धावांची भागीदारी करून सामना फिरवला व विक्रमाला गवसणी घातली. जॉनी बेअरस्टो १४५ चेंडूंत १५ चौकार व एक षटकारासह ११४ धावांवर, तर जो रूट १७३ चेंडूंत १९ चौकार व एक षटकारासह १४२ धावांवर नाबाद राहिला.

## बॉक्सिंग स्पर्धेत भारताच्या अल्फियाला सुवर्णपदक

**नूर-सुलतान : वृत्तसंस्था**

एलोर्डा चषक बॉक्सिंग स्पर्धेत भारताच्या अल्फिया पठाणने माजी विश्वविजेत्या कझाकस्तानच्या लज्ज़त कुंगेबायेव्हाला पराभवाचा धक्का देत सुवर्णपदक जिंकले. या स्पर्धेच्या माध्यमातून तिने वरिष्ठ गटातील आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये पदार्पण केले.

कझाकस्तानची राजधानी नूर-सुलतान येथे झालेल्या या स्पर्धेतील ८१ किलोवरील वजनी गटाच्या अंतिम सामन्यात नागपूरच्या अल्फियाने २०१६च्या जागतिक स्पर्धेतील विजेत्या कुंगेबायेव्हावर ५-० अशी सहज मात केली. अल्फियाने युवा जागतिक स्पर्धेतही सुवर्णपदक आपल्या नावे केले होते.

४८ किलो वजनी गटातील दोन भारतीय बॉक्सिंगपटूंमध्ये झालेल्या अंतिम लढतीत गितिकाने कलैवानी श्रीनिवासनचा ४-१ असा पराभव करीत सुवर्णपदक आपल्या नावे केले. ५४ किलो वजनी गटाच्या अंतिम लढतीत भारताच्या जमुना बोरोने उझबेकिस्तानच्या निगिना



उत्तामोव्हाकडून ०-५ अशी हार पत्करली. त्यामुळे तिला रौप्यपदकावर समाधान मानावे लागले. त्याचप्रमाणे ज्योती गुलिया (५२ किलो), साक्षी (५४ किलो), सोनिया (५७ किलो), नीमा (६३ किलो), ललिता (७० किलो) आणि बबिता बिश्त (९२ किलो) यांनी महिलांमध्ये, तर कुलदीप कुमार (४८ किलो), अनंत चोपडे (५४ किलो), सचिन (५७ किलो) आणि जुग्नू (९२ किलो) यांनी पुरुषांमध्ये कांस्यपदक मिळवले.

## भारतीय महिला संघाची श्रीलंकेविरुद्ध विजयी आघाडी

**पालेकेले : वृत्तसंस्था**

भारतीय महिला संघाने स्मृती मानधना (८३ चेंडूंत नाबाद ९४ धावा) आणि शफाली वर्मा (७१ चेंडूंत नाबाद ७१) या सलामीच्या जोडीच्या आक्रमक फलंदाजीच्या जोरावर दुसऱ्या एकदिवसीय क्रिकेट सामन्यात श्रीलंकेवर १० गडी राखून मात केली.

श्रीलंकेने दिलेले १७४ धावांचे लक्ष्य भारताने २५.४ षटकांत एकही गडी न गमावता पूर्ण करीत तीन सामन्यांच्या मालिकेत २-० अशी विजयी आघाडी घेतली. महिला एकदिवसीय क्रिकेटमध्ये एकही गडी न गमावता धावांचा यशस्वी पाठलाग करताना कोणत्याही संघाची ही सर्वोच्च धावसंख्या ठरली.

प्रथम फलंदाजी करताना श्रीलंकेचा डाव ५० षटकांत १७३ धावांवर आटोपला होता. त्यांच्याकडून अमा कंचना (नाबाद ४७), निलाक्षी डीसिल्वा (३२) आणि कर्णधार चमारी अटापट्टू (२७) यांनी चांगली फलंदाजी केली. भारताची मध्यमगती गोलंदाज रेणुका सिंगने (४/२८) भेदक मारा करताना श्रीलंकेच्या फलंदाजांना अडचणीत टाकले.

**संक्षिप्त धावफलक**

श्रीलंका : ५० षटकांत सर्व बाद १७३ (अमा कंचना नाबाद ४७, निलाक्षी डीसिल्वा ३२; रेणुका सिंग ४/२८, दीप्ती शर्मा २/३०) पराभूत वि. भारत : २५.४ षटकांत बिनबाद १७४ (स्मृती मानधना नाबाद ९४, शफाली वर्मा नाबाद ७१) सामनावीर : रेणुका सिंग.

## किकबॉक्सिंग स्पर्धेत रसायनीतील खेळाडूंचे सुयश

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

रायगड किकबॉक्सिंग असोसिएशनच्या वतीने आयोजित रायगड जिल्हास्तरीय किकबॉक्सिंग अजिंक्यपद स्पर्धेत रसायनीतील खेळाडूंनी शानदार कामगिरी करून पाच सुवर्ण, दोन रौप्य व सहा कांस्य अशी एकूण १३ पदक जिंकली.

स्पर्धा खांदा कॉलनी येथे झाली. स्पर्धेचे आयोजन जिल्हा किकबॉक्सिंग असोसिएशनचे अध्यक्ष आणि वाको किकबॉक्सिंग असोसिएशनचे महाराष्ट्र उपाध्यक्ष डॉ. मंदार पनवेलकर यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा किकबॉक्सिंग असोसिएशनचे सचिव निलेश भोसले यांनी केले होते. स्पर्धेत जिल्ह्यातील ५६५ खेळाडूंनी सहभाग घेतला. महाड, माणगाव, खालापूर, कर्जत, पेण, पनवेल, अलिबाग आदी ठिकाणांहून स्पर्धक आले होते. यामध्ये रसायनीतील प्रशिक्षक संजय पाटील यांच्या संघातील १३ खेळाडूंनी विविध पदके जिंकली.




रसायनीतील विनायक संजय पाटील, अर्जुन विशाल जाधव, ज्ञानेश्वर लक्ष्मण कदम, अनसूया लक्ष्मण कदम, प्रांजळ प्रशांत धुमाळ यांनी सुवर्ण, जान्हवी बाळकृष्ण आगज व वरद संजय पाटील यांनी रौप्य, तर स्वराज रामदास काठावले, स्वरूप सदाशिव पाटील, धनंजय शिवाजी अहिरे, भावार्थ प्रशांत धुमाळ, ऋषिकुमार कृष्णकुमार पनारिया व ऋषभ नरेश मोरे यांनी रौप्यपदक पटकाविले. या सर्वांचे अभिनंदन होत आहे.

वाको महाराष्ट्र किकबॉक्सिंग अध्यक्ष संतोष म्हात्रे यांनी स्पर्धा आयोजन तसेच कौतुक रायगड जिल्ह्यात या खेळाच्या प्रचार व प्रसाराबद्दल अभिनंदन केले.

## न्यूझीलंडमध्ये पुरुष व महिला क्रिकेटपटूंना मिळणार समान मानधन

**वेलिंग्टन : वृत्तसंस्था**

महिला आणि पुरुष क्रिकेटपटूंना समान मानधन देण्याची घोषणा न्यूझीलंड क्रिकेट बोर्डाने केली आहे. त्यामुळे क्रिकेट जगतातील स्त्री-पुरुष समानतेची सुरुवात न्यूझीलंडने केल्याचे दिसून येत आहे.

न्यूझीलंड क्रिकेट बोर्डाकडून ५ जुलै रोजी अंतिम स्वरूप देण्यात आलेल्या करारांनुसार आता न्यूझीलंडच्या महिला आणि पुरुष क्रिकेटपटूंना समान मानधन मिळणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. हा निर्णय बोर्डाशी संबंधित सर्व प्रकारच्या क्रिकेटपटूंना लागू होणार असल्यामुळे एकदिवसीय, टी-२०, फोर्ड ट्रॉफी आणि सुपर स्मॅश लीगमध्ये खेळणाऱ्या महिला क्रिकेटपटूंनादेखील त्यांच्या श्रेणीतील पुरुष क्रिकेटपटूंएवढेच मानधन मिळणार आहे.

याशिवाय महिला क्रिकेटपटूंसोबत करण्यात येणाऱ्या करारांमध्येदेखील वाढ करण्यात आली आहे. त्यामुळे नवोदित महिला क्रिकेटपटूंना अधिकाधिक सामने खेळण्याची संधी उपलब्ध होऊ शकणार आहे. आंतरराष्ट्रीय आणि देशांतर्गत खेळणाऱ्या महिला क्रिकेटपटूंना पुरुषांप्रमाणेच मानधन मिळणे ही फार मोठी बाब आहे. हे एक मोठे पाऊल असून त्याचा तरुण महिला क्रिकेटपटूंना फायदा होणार आहे, अशी प्रतिक्रिया न्यूझीलंड महिला क्रिकेट संघाची कर्णधार सोफी डिव्हाईन हिने दिली.

न्यूझीलंड पुरुष संघाचा कर्णधार केन विल्यमसननेही या संदर्भात सकारात्मक प्रतिक्रिया दिली आहे.

### विम्बल्डन टेनिस स्पर्धा

## सानिया मिर्झाची सेमीफायनलमध्ये धडक

**लंडन : वृत्तसंस्था**

टेनिस जगतामध्ये सध्या विम्बल्डनचा थरार सुरू आहे. चार प्रतिष्ठित ग्रँडस्लॅम स्पर्धांपैकी एक असलेल्या या स्पर्धेत भारताची तारांकित खेळाडू सानिया मिर्झा धडाकेबाज कामगिरी करीत आहे. तिने क्रोएशियन साथीदार मेट पेव्हिकसह विम्बल्डनमधील मिश्र दुहेरीच्या उपांत्य फेरीत धडक मारली आहे. मिश्र दुहेरीच्या उपांत्यपूर्व फेरीच्या सामन्यात तिने गॅब्रिएला डुब्रोव्स्की आणि जॉन पीअर्स या जोडीचा ६-४, ३-६, ७-५ असा पराभव केला.

सानिया आणि पेव्हिक या सहाव्या मानांकित जोडीने चौथ्या मानांकित गॅब्रिएला डुब्रोव्स्की-जॉन पियर्स यांचा एक तास ४१ मिनिटे रंगलेल्या लढतीत पराभव केला. आता उर्वरित दोन सामने जिंकून सानियाला तिचे शेवटचे विम्बल्डन संस्मरणीय बनवायचे आहे. तिने प्रथमच विम्बल्डन ओपनच्या मिश्र दुहेरी प्रकारात उपांत्य फेरी गाठली. सानिया मिर्झाची ही शेवटची विम्बल्डन स्पर्धा आहे. या मोसमानंतर टेनिसमधून निवृत्ती घेणार असल्याचे तिने आधीच जाहीर केले आहे.



उपांत्य फेरीत सानिया आणि पेव्हिकची जोडी दुसऱ्या उपांत्यपूर्व फेरीतील विजेत्याशी भिडणार आहे. उपांत्यपूर्व फेरीतील दुसरा सामना डेजारे-नील स्कुप्स्की या द्वितीय मानांकित जोडी आणि सातव्या मानांकित जेलेना ओस्टापेन्को-रॉबर्ट फराह यांच्यात आहे. सानियाने महिला दुहेरी गटातही भाग घेतला होता, परंतु ती आणि तिची चेक जोडीदार लुसी ह्राडेका पहिल्याच सामन्यात बाहेर गेल्या होत्या.

## समालोचन करताना सेहवागची जीभ घसरली; विराटला म्हणाला 'छमिया'

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारत आणि इंग्लंडदम्यान सुरू असलेल्या कसोटी सामन्यात माजी भारतीय खेळाडू विरेंद्र सेहवागने विराट कोहलीवर केलेली एक टिप्पणी क्रिकेट चाहत्यांना अजिबात रुचलेली नाही. त्यांनी सेहवागला ट्रोल केले आहे.

इंग्लंडचा डाव सुरू असताना ६०व्या षटकात मोहम्मद सिराजने सॅम बिलिंग्जला त्रिफळाचित केले. यानंतर क्षेत्ररक्षण करणाऱ्या कोहलीने नाचून आनंद साजरा करण्यास सुरुवात केली. यावर हिंदी समालोचन करीत असलेला मोहम्मद कैफ सेहवागला म्हणाला, 'विराट कोहलीचा डान्स बघ'. यावर सेहवागने कोहलीची खिल्ली उडवली. तो म्हणाला, छमिया डान्स करीत आहे. सेहवागचा आवाज असलेला हा व्हिडीओ



सोशल मीडियावर वेगाने व्हायरल झाला आहे.

सेहवागने विराट कोहलीला 'छमिया' म्हटलेलं क्रिकेट चाहत्यांना अजिबात आवडले नाही. सोशल मीडियावर चाहत्यांनी सेहवागला चांगलेच फटकारले. सेहवागने त्याच्या भाषेवर जरा लक्ष दिले पाहिजे, असा सल्ला क्रिकेट चाहत्यांनी दिला आहे.

यापूर्वी सेहवागने विराट कोहली आणि जॉनी बेअरस्टो वादाबाबत ट्वीट करूनही विराटच्या चाहत्यांचा रोष ओढावून घेतला होता.




## भारतीय चाहत्यांविरोधात वर्षद्वेषी टिपण्णी; 'जंटलमन्स गेम'ला इंग्लंडमध्येच गालबोट

**लंडन : वृत्तसंस्था**

भारत आणि इंग्लंडमध्ये सुरू असणाऱ्या पाचव्या कसोटी सामन्यादरम्यान भारतीय प्रेक्षकांविरोधात वर्णद्वेषी टिप्पणी करण्यात आल्याचा प्रकार समोर आला. कसोटीच्या चौथ्या दिवशी एजबस्टन येथे सुरू असणाऱ्या सामन्यादरम्यान इंग्लंडच्या काही समर्थकांनी भारतीय चाहत्यावर वर्णद्वेषी टीका करीत हुज्जत घातली.

सामना पाहण्यासाठी मैदानात आलेल्या एका प्रेक्षकाने स्टॅण्डमधील फोटो पोस्ट करीत येथे भारतीय चाहत्यांना वर्णद्वेषी वागणूक दिली जात आहे. ब्लॉक क्रमांक २२मध्ये हा प्रकार घडला. आम्ही या संदर्भात संबंधित अधिकाऱ्यांकडे तक्रार करून त्यांना किमान १० वेळा कोण हे बोलले त्याबद्दलची माहिती दिली, मात्र त्यांनी आम्हाला कोणताही प्रतिसाद न देता जागेवर बसण्यास सांगितले, असे भारत आर्मीमधील सदस्याने ट्विटरवरून सांगितले.

या आरोपांवर यॉर्कशायरचा क्रिकेटपटू अझीम रफिकने हे फार क्लेशदायक आहे, असे म्हणत हा मुद्दा अधोरेखित करण्याचा प्रयत्न केला. याच क्रिकेटपटूने मागील वर्षी यॉर्कशायर क्रिकेटमध्ये वर्णद्वेषी वागणूक मिळत असल्याची टीका केल्यानंतर इंग्लंड क्रिकेट बोर्डाने नियमांमध्ये मोठे बदल केले होते.

या वादावर एजबस्टन क्रिकेट मैदानाच्या अधिकृत ट्विटर हॅण्डलवरुन रिप्लाय देण्यात आलाय. आम्हाला हे वाचून फार वाईट वाटत आहे. आम्ही अशा प्रकारच्या कोणत्याही वर्तणुकीचे समर्थन करीत नाही. या प्रकरणात लवकरात लवकर चौकशी करू, असे येथील प्रशासनाने म्हटले आहे.







हे दैनिक मल्हार नेटवर्क प्रा. लि. च्या वतीने कृष्णा चांगु ठाकुर यांनी सिद्धकला प्रिंट मिडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., ॲट प्लॉट नं. डब्ल्यू-२३०, टी.टी. सी. इंडस्ट्रियल एरिया, खैरणे एम.आय.डी.सी., ठाणे-बेलापूर रोड, नवी मुंबई -४००७१०, ठाणे जिल्हा, महाराष्ट्र येथे मुद्रीत करून शॉप नं. ४, ॲस्पायर प्राईड, प्लॉट नं. २२७, निअर रुपाली सिनेमा, पनवेल, जिल्हा - रायगड, पिन - ४१०२०६, महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. ✲ संपादक : देवदास लक्ष्मण मटाले ✲ E-mail : ramprahar@gmail.com ✲ RNI Regn. No. MAH MAR/2008/26534.

"Printed and Published by **Krishna Changu Thakur** on behalf of **Malhar Network Pvt. Ltd.** and Printed at **Siddhakala Print Media and Publications Pvt Ltd. Plot No. W 230, T. T. C. Industrial Area, Khairne MIDC, Thane Belapur Road, Navi Mumbai - 400 710, Thane Dist, Maharashtra** and published from **Shop No. 04, Aspire Pride, Rupali Cowk, Panvel, Navi, Mumbai 410 206, Panvel, Raigarh- 410206, Maharashtra. RNI Regd. No. MAHMAR/2008/26534, Editor : Devdas Laxman Matale**